POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०४ ● अंक-३१९ ● मुंबई, शुक्रवार, २० जून २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA


## शिवसेना वर्धापन दिनी मोठी घोषणा
## एकनाथ शिंदे आणि उद्धव ठाकरेंचा घणघणात



### एकनाथ शिंदे यांच्या भाषणातील प्रमुख मुद्दे

- **आम्ही बाळासाहेबांच्या विचारांचे तर ते सत्तेसाठी लाचार :** आपला मेळावा बाळासाहेबांच्या विचारांचा तर दुसरा मेळावा सत्तेसाठी लाचार झालेल्यांचा आहे. आपण बाळासाहेबांचा विचार जिवापाड जपलं. त्यामुळेच शिवसेनेची घोडदौड जोरात सुरू आहे.
- **यांनी हिंदुत्व, मराठी माणसाशी विश्वासघात केला :** बाळासाहेबांच्या विचारांचा आणि शिवसेनेचा विश्वासघात उद्धव ठाकरे यांनी केला. सरडाही रंग बदलतो, पण यांच्या इतके लवकर नाही. बाळासाहेबांनी हिंदुत्वासाठी मतदानाचा अधिकार गमावला, पण हिंदुत्व सोडलं नाही. पण त्यांचे वारसदार म्हणवणारे सत्तेसाठी लाचार झाले. बाळासाहेब असते तर यांना उलटं टांगून खालून मिरचीचा धूर दिला असता.
- **तुमच्यामुळे मराठी माणूस मुंबईबाहेर गेला :** आता यांना मराठी माणूस आठवेल. मराठी माणसाच्या नावाने खोटे गळे काढतील. यांच्यामुळे मराठी माणूस मुंबईबाहेर गेला. बदलापूरच्या बाहेर गेला.
- **हिंदुत्व सोडणाऱ्यांना महाराष्ट्राने जागा दाखवली :** हिंदुत्व हा काय टी शर्ट आहे का? तुम्ही म्हणता हिंदुत्व सोडलं नाही, मग बाळासाहेबांना हिंदुहृदयसम्राट म्हणताना जीभ का जड होते? हिंदूंना शिव्या देणाऱ्यांच्या मांडीला मांडी का लाऊन बसता? हिंदुत्व धरसोड करणाऱ्यांना महाराष्ट्राच्या जनतेने जागा दाखवली. ज्या २० जागा आल्या त्या काँग्रेसच्या मेहेरबानीमुळे आल्या.
- **मराठी आमचा श्वास आहे :** हिंदुत्व हा आत्मा आहे आणि मराठी आमचा श्वास आहे. राजकारणासाठी मराठीला कधीही अंतर देणार नाही हा माझा शब्द आहे.
- **कम ऑन किल मी' म्हणणाऱ्यांचा मुडदा महाराष्ट्राने आधीच पाडलाय :** 'कम ऑन किल मी' असं उद्धव ठाकरे म्हणाले. अरे मेलेल्यांना कोण मारणार? महाराष्ट्राच्या जनतेने यांचा मुडदा आधीच पाडला आहे. पण नुसताच शोर करून मनगटात जोर येत नाही. वाघाचं कातडं पांघरून लांडग्याला वाघ होता येत नाही. नुसता तोंडाच्या वाफा सोडून उपयोग नाही, मनगटात दम असावा लागतो. आमच्या नादाला लागू नका तुम्ही. तुम्हाला तीन वर्षांपूर्वी दाखवलंय.
- **यांचा जीव इटउ च्या तिजोरीत :** राक्षसाचा जीव जसा पोपटात असतो, तसा यांचा जीव बीएमसीच्या तिजोरीत आहे. सध्या मुंबईचा लढा कॅम्पेन सुरु केलं आहे. हा लढा आता आठवला, सत्तेत असताना काय केलं? लढायला घराबाहेर तर पडायला हवं. घरात बसून काही होत नाही. आता जे काही घरातून बाहेर पडत आहात त्या मागे एकनाथ शिंदे आहे. मुंबई महाराष्ट्राची आहे आणि कुणाचा बाप जरी आला तरी मुंबई महाराष्ट्रापासून कुणी तोडू शकणार नाही.
- **'लाडक्या सूनेचं रक्षण, हेच शिवसेनेचं वचन' मोहीम सुरू :** यापुढे राज्यात सूनांचा छळ होणार नाही. त्यांच्या रक्षणासाठी शिवसेनेने 'लाडक्या सूनेचं रक्षण, हेच शिवसेनेचं वचन' ही मोहीम सुरु केली आहे. ज्या ठिकाणी सूनांचा छळ होईल त्या ठिकाणी आमच्या रणरागिणी धावून जातील. शिवसेनेच्या शाखा लाडक्या सूनांसाठी हक्काचं ठिकाण असेल.

### उद्धव ठाकरेंची वर्धापन दिनी मोठी घोषणा

- **ज्यांना पोरं होत नाहीत ते आमच्यावर टीका करतात :** शिवसेना अजूनही तरुण आहे अजून ही तरुणच राहणार आहे. तिकडे चोरांचा बाजार भरला होता. पहिल्या मेळाव्याच्या वेळी बाळासाहेब यांनी शिवाजी पार्कत मेळावा घेतला होता. त्यावेळी मी माज्या माँच्या मांडीवर बसलो होतो. राजकारणात ज्यांना पोरं होतं नाहीत ते आमच्यावर टीका करतात. तुला पोर होत नाहीत त्याला आम्ही काय करू? किती पाहिजे आहेत तेवढी पोर घे. भाजपला स्वतःची पोरं नाहीत त्यामुळे त्यांना अशी घ्यावी लागतात. ते आपल्याला हिंदुत्व शिकवत आहेत. ज्या वल्लभ भाई पटेल यांनी भाजपवर बंदी आणली त्यांचाच पुतळा सरदार वल्लभ भाई पटेल यांचा पुतळा बांधण्याची वेळ आली
- **तिकडे चोरांचा बाजार भरलाय :** एवढी माणसं चोरली, पक्ष चोरला, वडील चोरले तरी उद्धव ठाकरे संपत कसा नाही? असा प्रश्न त्यांना पडला असेल. पण शिवसैनिकांनी रक्त आटवून ही शिवसेना उभारली आहे. पैसे फेकून नव्हे तर कष्ट करून ही संपत्ती जमवली आहे. दुसरीकडे चोरांचा बाजार सुरू आहे.
- **अरे तुझा जीव किती, बोलतो कुणावर? नितेश राणेंवर टीका :** उंची पेंग्विनची, चाल बदकाची आणि आवाज कोंबडीचा, डोळे कुणासारखे ते माहिती नाही. अरे तुझा जीव किती, तू बोलतो किती? तुज्या वडिलांची पार्श्वभूमी काय? एक कुणीतरी बाप ठरवं आणि मग बोल असं म्हणत उद्धव ठाकरे यांनी भाजपचे आमदार नितेश राणे यांच्यावर टीका केली.
- **मनसेसोबत युतीवर उद्धव ठाकरेंचे मोठं वक्तव्य :** कार्यकर्त्यांच्या आणि राज्याच्या मनात जे आहे तेच मी करणार. पण हे होऊ नये म्हणून यांच्या मालकाचे लोक इकडे तिकडे, हॉटेलमध्ये भेटी घेत आहेत. मुंबई पुन्हा मराठी माणसाच्या ताब्यात गेली तर यांच्या मालकाचे काय होणार? मुंबईत मराठी माणूस एकत्र येऊ नये म्हणून हे प्रयत्न करत आहेत. मुंबई आम्हचीच. ठाकरे ब्रँड संपवायला गेला तर तुमचे नामोनिशाण ठेवणार नाही.
- **हिंदीची सक्ती खपवून घेणार नाही :** हिंदी सक्तीचा करण्याची गरज काय? हिंदीला आमचा विरोध नाही, पण हिंदीची सक्ती खपवून घेणार नाही. हिंदी सक्ती करायची तर ती गुजरातमध्ये करा. निवडणुकीच्या तोंडावर मराठी आणि अमराठीमध्ये भांडण लावण्याचा कार्यक्रम भाजपने केला. म्हणजे हे भ्रष्टाचार करायला मोकळे.
- **हे पणवती सरकार :** आतापर्यंत त्यांनी जे वादे केले होते ते फसवे केले होते. निवडणुकीत त्यांनी जनतेशी वादा यांनी पाळला नाही. मग मला केलेला वादा, अडीच वषार्चा मुख्यमंत्रिपदाचा तो तरी यांनी कसा पाळला असता. हे पणवती सरकार आहे. आम्ही इंडिया आघाडी स्थापन केली त्यावेळी इंडियन मुजाहिद्दीन सोबत तुलना करताना तुम्हाला लाज वाटली नाही. देशद्रोह्यांसोबत आमची तुलना करता आणि तुम्ही काय केले ते सांगायला आमचेच खासदार जगभर पाठवता.
- **तुमचं हिंदुत्व काय ते सांगा? :** तुमच हिंदुत्व काय आहे हे भाजपला मला विचारायचे आहे. सिंदूर वाटणाऱ्या त्या भाजप नेत्याला चाबकाने फोडायला हवे. कर्नल कुरेशी यांना पाकिस्तानची बहीण म्हणतो. अशा अवलादी भाजपच्या आहेत. ट्रम्प फोन आल्यानंतर यांचा आवाज गेला. वॉर रुखवा दी पापा. चार अतिरेकी आत आले कसे? संरक्षण मंत्री, गृहमंत्री गेले कुठे? पातळात गेले, आकाशात गेले की भाजपमध्ये गेले? आता केवळ दाऊदला पक्षात घायच बाकी आहे. भाजपने जेलच्या बाहेर सदस्य नोंदणीसाठी स्टॉल टाकले आहेत. आधी भ्रष्टचाराचे आरोप केले, एसआयटी लाऊ म्हणाले. आता कुठे गेली एसआयटी... एसटीत गेली की काय? विधानसभेला त्यांनी बटेंगे तो कटेंगे नारा दिला, हिंदू-मुस्लिम केलं. आता हिंदू-हिंदू मध्ये मारामाऱ्या होतील अशी परिस्थितीत यांनी केली आहे.

## यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ माजी विद्यार्थी संघाचे ५ लाख सदस्य
## माजी विद्यार्थ्यांची सर्वाधिक नोंदणी असलेले भारतातील पहिले राज्य विद्यापीठ

**■नाशिक। प्रतिनिधी :**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या माजी विद्यार्थी संघाने पाच लाख माजी विद्यार्थी सदस्य नोंदणीचा टप्पा पार केला आहे. दिनांक १० सप्टेंबर २०२० रोजी स्थापना झालेल्या या माजी विद्यार्थी संघाकडे गत पावणेपाच वर्षांपासून आजतागायत तब्बल ५ लाख ६ हजार ८५७ विद्यार्थ्यांनी सदस्यता नोंद केलेली आहे. त्यामुळे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ हे सर्वाधिक माजी विद्यार्थी सदस्य नोंदणी असलेले देशातील पहिले राज्य विद्यापीठ ठरले आहे. 'ज्ञानगंगा घरोघरी' हे ब्रीदवाक्य घेवून वाटचाल करणाऱ्या विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा आणखी एक तुरा रोवला गेला आहे.



सन १९८९ मध्ये मुक्त विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर त्यातून आजतागायत सुमारे ५५ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी विविध शिक्षणक्रमांच्या पदव्या प्राप्त केलेल्या आहेत. सन २०२० मध्ये विद्यापीठात माजी विद्यार्थी संघाची स्थापना करण्यात आली. त्यात सामील होण्यासाठी विद्यापीठाने आपल्या विद्यार्थ्यांना www.ycmoualumni.org हे संकेतस्थळ उपलब्ध करून दिले. त्यात त्यांनी कोणत्या विद्याशाखेतून कोणता शिक्षणक्रम कधी पूर्ण केला, सध्या ते कोणत्या आस्थापनेत कोणत्या पदावर काम करत आहेत, या माहितीसह सदस्य होण्याचे आवाहन करण्यात आले होते. पाठोपाठ तंत्रज्ञानाचा व विविध समाजमाध्यमांचा प्रभावी वापर करत माजी विद्यार्थ्यांचे संघठन वाढविण्यावर भर देण्यात आला. त्यांच्या निरनिराळ्या अडचणी सोडवण्यास प्राधान्य देण्यात आले. त्यामुळे माजी विद्यार्थी संघाच्या सदस्य संख्येत दिवसागणिक वाढ होत आहे. या सर्व विद्यार्थ्यांची विदा-माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अपलोड करण्यात आली आहे. उर्वरित विद्यार्थ्यांना विद्यापीठाशी जोडण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. विद्यापीठाने यापूर्वी उल्लेखनीय माजी विद्यार्थ्यांच्या यशोगाथा पुस्तकरूपात प्रसिद्ध केल्या आहेत. विद्यापीठ दृकश्राव्य विभागाचे डॉ. संतोष साबळे हे स्थापनेपासून या माजी विद्यार्थी संघाचे सरचिटणीस म्हणून प्रमुख कार्य करत आहेत.

विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली लवकरच जगभरातील माजी विद्यार्थांचा मेळावा आयोजित करण्याचा मनोदय असल्याचे या माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष तथा विद्यापीठाचे कुलसचिव श्री. दिलीप भरड यांनी सांगितले. विद्यार्थ्यांची नोंदणी वाढविण्यासाठी मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्या डॉ. संजीवनी महाले, उपाध्यक्ष डॉ. गोविंद कतलाकुटे, खजिनदार कविता देव, डॉ. नितीन ठोके, डॉ. प्रकाश देशमुख, माजी विद्यार्थिनी धावपटू कविता राऊत, राहुल खैरनार आदींचे सहकार्य लाभले आहे. दरम्यान, मुक्त विद्यापीठातून कोणताही शिक्षणक्रम पूर्ण केलेल्या माजी विद्यार्थ्यांनी उपरोक्त संकेतस्थळास भेट देवून आपली नोंदणी करावी असे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.

### माजी विद्यार्थ्यांसाठी राज्यभर उपक्रम राबविणार

"विविध क्षेत्रात कार्यरत विद्यापीठाच्या माजी विद्यार्थ्यांची नाळ विद्यापीठाशी जोडली जावी, त्यांची एकमेकांशी ओळख व्हावी, विद्यापीठाच्या विविध उपक्रमांची माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचावी, नवीन विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी त्यांचा फायदा व्हावा या उद्देशाने माजी विद्यार्थी संघाची स्थापना करण्यात आली. त्याची धमार्दाय आयुक्त कार्यालयात रीतसर नोंदणी आहे. पाच लाख माजी विद्यार्थी सदस्य नोंदणीचा टप्पा पार झाल्याबद्दल मनस्वी आनंद आहे. आगामी काळात विद्यापीठातर्फे माजी विद्यार्थ्यांसाठी भरीव उपक्रम राज्याच्या विविध भागात राबविण्यात येतील.."

**-मा. प्रा. संजीव सोनवणे. कुलगुर, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र राज्य**

## रात्री ११ वाजता सुरु होती बँकेची शाखा
## कोणाला वाटले पैसे? मोठा राडा

**■मुंबई। प्रतिनिधी :**

बारामती शहरातील आमराई परिसरातील पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची शाखा बुधवारी १८ जून रोजी मध्यरात्रीच्या आसपासही सुरु होती अशी धक्कादायक माहिती समोर आली आहे. बुधवारी म्हणजेच काल रात्री ११ वाजता देखील ही बँक उघडी होती, आरोप करण्यात आला आहे. या आरोपामुळे एकच खळबळ उडाली असून याचा संबंध माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीशी जोडला जात आहे. मागील काही दिवसांपासून उपमुख्यमंत्री अजित पवार लढत असलेल्या या निवडणुकीला प्रतिष्ठेचा मुद्दा बनवण्यात आलं आहे.

**बँक का उघडी ठेवण्यात आली होती?**

बारामती शहरातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत सध्या सुरू असलेल्या माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीतील मतदारांच्या याद्या देखील सापडल्याचा दावा 'सहकार बचाव पॅनल'कडून करण्यात आला आहे. रात्रीच्या अकरा वाजता नेमकी ही बँक का उघडी ठेवण्यात आली होती? असा सवाल 'सहकार बचाव पॅनल'चे कार्यकर्ते विचारत आहेत. या बँकेतून पैसे वाटप होत असल्याचा आरोप देखील केला जातोय. या ठिकाणी गोंधळ होणार याची कुजबूज सुरु झाल्यानंतर तातडीने रात्रीच पोलीस इथे दाखल झाले. रात्री उशीरा ही बँक सुरु का यासंदर्भात 'सहकार बचाव पॅनल'चे रंजन तावरे हे जाब विचारताना दिसले.




**कोण आहे आमने-सामने?**

माळेगाव सहकारी साखर कारखान्याची निवडणूक सुरु असून या निवडणुकीमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या 'निळकंठेश्वर पॅनल' आणि चंद्रराव तावरेंच्या 'सहकार बचाव पॅनल'मध्ये थेट लढत आहे. म्हणूनच ही बँक उघडी असल्याच्या मुद्द्यावरुन दोन्हीकडील कार्यकर्त्यांमध्ये रात्री बँकेतच पोलिसांसमोर बाचाबाची झाल्याचं पाहायला मिळालं.

### निवडणुकीवरुन आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी

शनिवारी पत्रकारांशी संवाद साधताना तावरेंनी अजित पवारांवर टीका केली होती. शरद पवारांनी सांगितल्याने जिल्हा बँकेच्या निवडणुकीत आम्ही मदत केल्याने उपमुख्यमंत्री अजित पवार राजकारणात आले. मात्र आता ते निवडणुकीच्या काळात सहकारी संस्थांचा गैरवापर करत आहेत. त्यांच्या घरात अनेक कारखान्यांचे आणि विविध प्रशासकीय कर्मचारी आहेत. त्यांचा ते गैरवापर करतात, असा आरोप तावरेंनी केला. त्यालाच वयाचा मुद्दा उपस्थित करत अजित पवारांनी जाहीर भाषणातून 16 जूनच्या जाहीर सभेच्या माध्यमातून उत्तर दिलं. अजित पवारांनी माळेगाव कारखान्याचे माजी अध्यक्ष तसेच भाजपा नेते चंद्रराव तावरेंच्या नावाचा थेट उल्लेख न करता मागील काही दिवसांमध्ये घेतलेल्या प्रचार सभांमधून टीका केल्याचं पाहायला मिळालं. दुसरीकडे चंद्रराव तावरेंनीही अजित पवारांना लक्ष्य केल्याचं पाहायला मिळालं. 16 जूनच्या जाहीर सभेत ₹85 वर्ष वय झालंय आता. विसमरण होतंय,₹ असं म्हणत अजित पवार यांनी चंद्रराव तावरे यांच्यावर नाव न घेता टीका केली. ₹(निवडणुकीला) उभं राहण्याचे अधिकार सर्वांना आहे. मात्र 85 वयात कशाला? विसमरण होतंय तब्येत साथ देत नाही. आता पायजमा सोडला आणि लुंगी घातली,₹ अशी शाब्दिक टोलवा टोलवी अजित पवार यांनी चंद्रराव तावरे यांच्या नावाचा थेट उल्लेख न करता केली.

## कष्टाने कमावलेले स्वतःचेच पैसे परत मिळेना...
## बीडमध्ये बँकेच्या गेटवर वधूपित्याने घेतला गळफास

**■बीड। प्रतिनिधी :**

आपल्या मुला-मुलींचं लग्न मोठ्या थाटामाटात व्हावं अशी प्रत्येक आई-वडिलांचं स्वप्न असतं. यासाठी अनेक पालक आयुष्यभर झटतात आणि पै अन् पै बाजूला काढून ठेवतात. आयुष्यातील सर्वात महत्त्वाच्या सोहळ्यांपैकी एक असलेल्या आपल्या लाडक्या लेकाच्या किंवा लेकीच्या लग्नासाठी कसलीही कमतरता राहू नये यासाठी कष्टाने बाजूला ठेवलेला पैसा योग्य पद्धतीने खर्च करता यावा असं नियोजन पालक करतात. मात्र असं स्वप्न उराशी बाळगलेल्या बीडमधील एका वडिलांनी लेकीच्या लग्नासाठी बाजूला ठेवलेले पैसे तर मिळाले नाहीच त्यांना चक्क बँकेच्या गेटवरच शेवटचा श्वास घेत जगाचा निरोप घ्यावा लागला.




काळजी पिळवटून टाकणारी ही घटना घडली आहे बीडमधील गेवराईमध्ये! गेवराई तालुक्यातील खळेगावात राहणाऱ्या सुरेश आत्माराम जाधव यांनी लेकीच्या लग्नाचं स्वप्न उराशी बाळगतच जीव सोडला. सुरेश हे येथील छत्रपती मल्टीस्टेट बँकेतील ठेवीदार होते. त्यांनी या बँकेच्या गेटलाच गळफास घेत आत्महत्या केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुरेश यांचं छत्रपती मल्टीस्टेट बँकेबरोबरच ज्ञानराधा मल्टीस्टेट बँकेत खातं होतं. या दोन्ही बँकांमधील पैसे त्यांना लेकीच्या लग्नासाठी काढायचे होते. मात्र त्यांना तसं करता आलं नाही.

**लेकीच्या लग्नासाठी काढणार होते स्वतः बाजूला काढलेले पैसे**

समोर आलेल्या माहितीप्रमाणे, सुरेश जाधव यांनी लाडक्या लेकीचं लग्न जवळ येत असल्याने छत्रपती मल्टीस्टेट बँकेतील आपल्या ११ लाख रुपयांच्या ठेवी काढण्याची प्रक्रिया समजून घेत त्यासाठी प्रयत्न सुरु केले. त्याचवेळी त्यांनी अतिरिक्त पैसे हाताशी असावेत म्हणून ज्ञानराखा मल्टीस्टेट बँकेत ठेवलेल्या ५ लाख रुपयांच्या ठेवी काढण्यासाठीही प्रक्रिया सुरु केली. मुलीच्या लग्नासाठी सुरेश यांना १६ लाख रुपयांची गरज असल्याने त्यांनी मागील अनेक वर्षांपासून साठवलेले पैसै बँकेतून काढण्यासाठी बँकेच्या फेऱ्या मारण्यास सुरुवात केली.

**बुधवारी रात्री उशिरा बँकेत गेले अन्...**

मात्र सतत बँकेच्या फेऱ्या मारूनही सुरेश जावध यांना बँकेतील रक्कम परत मिळाली नाही. या मानसिक त्रासामुळे सुरेश जाधव यांनी स्वतःला संपवण्याचं टोकाचं पाऊल उचललं. बुधवारी रात्री उशिरा सुरेश जाधव कुटुंबासहीत बँकेत गेले होते. त्यानंतर पुढील काही वेळातच सुरेश जाधव हे बँकेच्या मुख्य गेटवर मृत अवस्थेत आढळले. या प्रकारामुळे परिसरात एकच हळहळ व्यक्त होत. सुरेश जाधव यांना बँकांनी ज्या पद्धतीची वागणूक दिली त्यावरुन मल्टीस्टेट बँकांची विश्वासार्हता पुन्हा एकदा चचेर्चा विषय ठरत आहे. सुरेश जाधव यांच्या मृत्यूस जबाबदार कोण? असा सवाल आता सर्वसामान्यांकडून विचारला जात आहे.

## ५० रुपयांसाठी तरुणाचा जीव घेतला!
## लातूरमध्ये जे घडलं ते पाहून पोलिसही हादरले

**■लातूर। प्रतिनिधी :**

तुम्ही कधी कोणाला उधारी देता का? जर देत असाल तर ही बातमी तुमच्यासाठी धक्कादायक ठरू शकते. कारण लातूरमध्ये अवघ्या ५० रुपयांच्या उधारीसाठी एका युवकाची निर्घृणपणे हत्या करण्यात आली आहे. कोयत्याने वार करून दोघांना गंभीर जखमी करण्यात आले असून ही धक्कादायक घटना लातूरच्या म्हाडा कॉलनी परिसरात घडली असून, या घटनेने संपूर्ण लातूर हादरून गेलं आहे. या प्रकरणी विवेकानंद चौक पोलिसांनी तत्काळ कारवाई करत दोघांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला आहे.




पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, लातुरातील म्हाडा कॉलनीत रस्त्यालगत पानटपरी आहे. याच परिसरातील एकाकडे पानटपरीची ५० रुपयांची उधारी होती. उधारीवरुन शेख अब्बास आणि शेख शहजाद (दोघेही रा. म्हाडा कॉलनी) यांनी बालाजी गायकवाड याच्या टपरीवर येत वाद घातला होता. शिवाय, धमकीदेखील दिली होती. याचा जाब विचारण्यासाठी गेलेल्या नातेवाईकावर दोघांनी धारदार शस्त्राने, सुरा, कोयत्याने हल्ला केला. यात गणेश सूर्यवंशी यांचा मृत्यू झाला, तर इतर तिघे जखमी झाले आहेत.

पानटपरीची ५० रुपयांची उधारी मागितल्याच्या कारणावरून हा वाद झाला. या वादातूनच बाचाबाची झाली आणि आरोपींनी धारदार शस्त्र, सुरा, कोयत्याने चौघांवर हल्ला केला. यातील गंभीर जखमी गणेश सूर्यवंशी याचा रुग्णालयामध्ये मृत्यू झाला, तर अन्य तिघे गंभीर जखमी झाले आहेत. दोघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आलाय आणि त्यांना अटक ही करण्यात आली असल्याची माहिती लातूर शहर पोलिस उपअधीक्षक रणजित

## 'तुझे तसले फोटो व्हायरल करेन'
## धमकी देत, मारहारण करत अल्पवयीन मूलीवर बलात्कार

**■अकोला। प्रतिनिधी :**

अकोल्यातून संतापजनक घटना समोर आली आहे. येथे एका अल्पवयीन मुलीचे शोषण करण्यात आलंय. अकोला शहरातील खदान पोलीस ठाण्यात हद्दीत हा प्रकार घडलाय. एका अल्पवयीन मुलीला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिचे अश्लील व्हिडिओ-फोटो व्हायरल करण्याची धमकी देण्याचा प्रकार घडलाय. यानंतर पीडित मुलीवर बलात्कार करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली. याप्रकरणी खदान पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार, आरोपींकडून पीडितेला मारहाण करत शोषण केल्याची घटना समोर आली आहे. याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होतोय. तर आरोपीकडून पिडीतेचे अश्लील फोटोही व्हायरल करण्यात आले आहेत. एका सामाजिक कार्यकर्त्याच्या मदतीने पीडितेच्या आईकडून अकोल्यातील खदान पोलीस स्टेशनला तक्रार देण्यात आली. याप्रकरणी तिघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणातील आरोपी हे अल्पवयीन असल्याचं पोलिसांचं म्हणणं आहे. मात्र यामध्ये अधिक चौकशी करण्यात येत आहे. आरोपींनी पीडित मुलीचे अश्लील फोटो आणि व्हिडिओ काढून इंस्टाग्रामवर व्हायरल केले आहेत. दरम्यान या प्रकरणी आणखी पीडित आणि आरोपी वाढण्याची शक्यता देखील आहे त्यामुळे पोलिसांनी त्या दिशेने तपास सुरू केला आहे.



### 'अल्पवयीन मुलाच्या तोंडात गोळा कोंबला अन् नंतर...'

कोल्हापुरात अल्पवयीन मुलाने आपल्या मित्राची हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मात्र यापेक्षा धक्कादायक यामागील कारण आहे. मदरसा बंद होऊ सुट्टी मिळावी यासाठी मुलाने आपल्यात मित्राला ठार केलं. तरुणाने तोंडात गोळा कोंबून विजेचा शॉक देऊन मित्राची हत्या केली आहे. हातकणंगले पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसंच पोलिसांनी याप्रकरणी अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतलं आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले तालुक्यात आळते इथं असलेल्या मदरशात शिक्षण घेणाऱ्या एका अल्पवयीन विद्यार्थ्याने मदरसा बंद पडून आपल्याला सुट्टी मिळावी यासाठी मित्राचा खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. रात्रीच्या अंधाराचा फायदा घेवून संबंधित अल्पवयीन विद्यार्थ्याने 11 वर्षीय फैजान नजिम याच्या तोंडात गोळा कोंबला, त्यानंतर विजेचा शॉक देऊन खून केला. ही धक्कादायक घटना उघडकीस आल्यानंतर कोल्हापूर जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. खून झालेला 11 वर्षीय फैजान नजिम हा बिहार राज्यातला आहे. कोल्हापूर पोलिसांनी तपास करून अल्पवयीन मित्राला ताब्यात घेतले आहे. या गुन्ह्याची हातकणंगले पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## ती आगीनं होरपळली, विव्हळत पडली, डॉक्टर आलेच नाहीत

### नेमकं प्रकरण काय?

बीड शहरातील विवाहित महिला घरात अचानक लागलेल्या आगीमध्ये होरपळल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या दुर्घटनेनंतर या महिलेला जळालेल्या अवस्थेतच जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. बीड शहरातील शिंदे नगर भागात ही घटना घडली. होरपळलेल्या महिलेचे नाव स्वाती कानडे असून ही महिला २६ वर्षांची आहे. आज (१८ जून) दुपारी राहत्या घरात अचानक लागलेल्या आगीमध्ये ही महिला ५५ ते ६० टक्के जळाली आहे. तत्काळ रुग्णालयात दाखल करूनही ती तिथे जवळपास दीड तास विव्हळत पडली होती.

**■बीड। प्रतिनिधी :**

राज्यात शासनाच्या आरोग्य व्यवस्थेवर नेहमीच प्रश्नचिन्ह उपस्थित केला जातो. शासकीय रुग्णालयांत डॉक्टरांची कमतरता, रुग्णांची होत असलेली हेळसांड, उपकरणांचा अभाव, तंत्रज्ञानाचा अभाव यासारख्या त्रुटींमुळे राज्यातल्या अनेक रुग्णालयांत रुग्णांची प्रचंड हेळसांड होते. यातून काही रुग्णांचा मृत्यू झाल्याच्याही अनेक घटना समोर आल्या आहेत. असे असतानाच आता बीड जिल्ह्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. एक महिला आगीमध्ये होरपळलेली असूनही तिच्यावर उपचार करण्यासाठी बीडच्या शासकीय रुग्णालयातील डॉक्टर आलेच नाहीत. परिणामी तिची प्रकृती आता गंभीर झाली आहे.



**डॉक्टरांनी या महिलेवर उपचार केले नाहीत**

या महिलेला दुपारी दीड वाजता दाखल करण्यात आलं होतं. मात्र तीन वाजेपर्यंत म्हणजेच दीड तास कोणत्याही डॉक्टरांनी या महिलेवर उपचार केले नाहीत. कोणतेही डॉक्टर तपासण्यासाठी त्या ठिकाणी पोहोचले नाहीत असा महिलेच्या नातेवाईकांनी आरोप केला आहे. महिलेला जिल्हा रुग्णालयात उपचार मिळत नसल्याने या महिलेला शेवटी बीड शहरातील गीताई या खासगी रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले.

**डॉक्टरांवर कारवाई करावी**

सध्या या महिलेवर खासगी रुग्णालयात उपचार चालू आहेत. तर महिलेची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे. दरम्यान दोषी कर्मचारी आणि डॉक्टरांवर कारवाई करण्याची मागणी नातेवाईकांकडून करण्यात येत आहे.

**रुग्णालयाने काय स्पष्टीकरण दिले?**

तर दुसरीकडे आमचे डॉक्टर पोहोचले होते मात्र तोपर्यंत पेशंट त्या ठिकाणाहून हलवण्यात आले होते. त्यांनी रुग्णाला सुरुवातीला अपघात विभागात आणणं गरजेचं होतं. मात्र त्यांनी तसं न करता रुग्णाला जळीत कक्षात नेले. यामुळे डॉक्टरांना तिथे पोहोचायला वेळ लागला, असे स्पष्टीकरण रुग्णालय प्रशासनाने दिले आहे. तसेच या संदर्भात आम्ही चौकशी करू. कोणी दोषी आढळले तर कारवाई करु, असं बीड जिल्हा शल्य चिकित्सक डॉक्टर संजय राऊत सांगितलं आहे.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# वाद करून उपयोग नाही...

यंदाच्या शैक्षणिक वर्षात म्हणजे २०२५-२६ पासून राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. नव्या शैक्षणिक धोरणसंबंधीचा नवा जीआर मंगळवारी जारी झाला आणि वादाला पुन्हा तोंड फुटले. या आधी एप्रिलमध्ये यासंबंधीचा जीआर काढण्यात आला होता. त्यात मराठी, इंग्रजीसह हिंदी भाषेचीही सक्ती करण्यात आली होती. पण त्यावर चौफेर टीका झाली आणि सर्वांनीच आक्रमक भूमिका घेतल्यावर सरकारने लगेच माघार घेत, हिंदी भाषेपुढील अनिवार्य शब्द मागे घेतला. वास्तविक नव्या शैक्षणिक धोरणानुसार ९ सप्टेंबर २०२४ ला तीन भाषांपैकी २ भाषा आपल्या देशाशी संबंधित असल्या पाहिजेत. त्यामुळे राज्य सुकाणू समितीच्या बैठकीत तिसरी भाषा हिंदी म्हणून स्वीकारण्याचा निर्णय घेण्यात आला. त्याच आधारे शासन निर्णयामध्ये हिंदी भाषा 'अनिवार्य' असेल असा उल्लेख करण्यात आला होता. मात्र, अनेक शिक्षण तज्ज्ञांसह महाराष्ट्र नवनिर्माण सेना, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष यासह इतर पक्ष आणि संघटनांनी त्याला विरोध केला. आता नव्याने जारी झालेल्या शासन निर्णयात 'अनिवार्य' शब्द काढून टाकण्यात आला आहे. त्याऐवजी कोणतीही पर्यायी भारतीय भाषा निवडण्याची मुभा देण्यात आली आहे. यासाठी किमान २० विद्यार्थ्यांची गरज आहे. तसे असेल तर नव्या शिक्षकाची नियुक्ती करता येऊ शकेल, अन्यथा कमी विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन व्यवस्था करण्यात येणार आहे. पण त्यात मेख अशी की, तिसरी भाषा निवडताना मराठी भाषिकांसाठी हिंदी भाषेशिवाय पर्याय नाही. कारण, मराठी आणि इंग्रजी भाषा सक्तीची आहे. तर, पर्यायी भाषेचा लाभ मराठीव्यतिरिक्त अन्य भाषिक विद्यार्थ्यांना जास्त होणार आहे. तामिळ, मल्याळी, तेलुगु, कन्नड, बंगाली, आसामी अशा अनेक भाषांची निवड संबंधित भाषिक विद्यार्थी करू शकतील. पण मराठी मुलांचे काय? त्यांना तर हिंदी भाषेशिवाय पर्यायच नाही. त्यामुळे सर्वच विरोधक या जीआरविरोधात एकवटल्याचे दिसतात. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील याच त्रिभाषा सूत्राला तामिळनाडूने कडाडून विरोध केला आहे. महत्त्वाचे म्हणजे, त्यांचा हा विरोध आताचा नाही, साधारणपणे १९३०-४० पासून तामिळनाडूची भूमिका ही हिंदी भाषेला विरोध आणि द्विभाषा सूत्राचा पुरस्कार अशीच राहिली आहे. याच सूत्रासाठी तिथे मोठी आंदोलनेही झाली आहेत. या आंदोलनात काहींनी जीवही गमावले. तामिळनाडूला फक्त मातृभाषा तामिळ आणि इंग्रजी या दोनच भाषा पाहिजेत. मातृभाषेत शिक्षण घेणे विद्यार्थ्यांना सुलभ जाईल आणि इंग्रजी ही भाषा जगाशी संवाद साधणारी आहे, शिवाय विविध संधींचे दरवाजे उघडणारी आहे, असे तामिळनाडूचे आग्रहीपणाचे म्हणणे आहे. हिंदी भाषा जिथे लागू केली जाते, तिथे स्थानिक भाषा लोप पावतात, असा दावा तामिळनाडूच्या नेत्यांचा आहे. आपण आपल्या भाषेचे संरक्षण करण्यात अयशस्वी ठरलो तर, आपल्या संस्कृतीवर हिंदी भाषेचा वरचष्मा राहील आणि आपली ओळख नष्ट होईल. त्यामुळे द्रविड चळवळ हिंदी लादण्याच्या विरोधात असून त्या भाषेबद्दल शत्रुत्व नाही, अशी भूमिका तामिळनाडूचे उपमुख्यमंत्री उदयनिधी स्टॅलिन यांनी मांडली आहे. आता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही बुधवारी सकाळी पत्रकार परिषद घेऊन या शासन निर्णयाला विरोध करत थेट महायुती सरकारला आक्रमकपणे आव्हान दिले आहे. तिसरी भाषा अनिवार्य नाही मग पुस्तक छपाई का सुरू आहे, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. उत्तरेतील लोकांना सुसंस्कृत महाराष्ट्र काबीज करायचा आहे, म्हणूनच भाषा सक्ती केली जात आहे. जिचा काही उपयोग नाही, अशी भाषा शिकवू नका, असे आवाहन त्यांनी शाळांना केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे राज्य असलेल्या गुजरातमध्येही पहिलीपासून गुजराती, गणित आणि इंग्रजी भाषा सक्तीची आहे. तिथे देखील हिंदी भाषेची सक्ती नाही. मग महाराष्ट्रातच हिंदीची सक्ती का करण्यात येत आहे? असा परखड सवाल त्यांनी केला आहे. मुळात राष्ट्रीय धोरण म्हटल्यावर त्यात 'पर्याय' कसा काय येऊ शकतो, हा अगम्य प्रश्न आहे. जेव्हा राष्ट्रीय धोरण राबवले जाते, तेव्हा त्याआधी त्याचा बारकाईने अभ्यास करून, होणारे परिणाम याचा सारासार विचार करूनच ते तयार केलेले असते. मग ते धोरण सर्वच राज्यांना काटेकोरपणे लागू करणे बंधनकारक असायला हवे. तसे जर नसेल तर, त्याला राष्ट्रीय धोरण कसे म्हणता येईल? आता मराठी भाषेबद्दल बोलायचे झाले तर, एकतर सर्व शाळांमध्ये मराठी भाषा सक्तीची केली असल्याने अन्य भाषेला विरोध करण्याचे काहीच कारण नाही. मुंबई-पुण्यासारख्या बहुभाषिक शहरांमध्ये मराठी माणसेही सर्रास हिंदी बोलताना दिसतात. मग मराठी भाषेचे जतन हे केवळ शाळेपुरते मर्यादित नसून सर्वसामान्यांनीही या भाषेचा सन्मान केला पाहिजे. त्रिभाषा सूत्राला द्विभाषा धोरण लागू करून मुलांना भविष्यात उपयोगी पडेल, अशा एखाद्या विषयाचा विचार व्हायला पाहिजे. सक्ती केल्याचा वाद करून उपयोग नाही. मराठी भाषेच्या जतनासाठी सर्वसामान्यांनीही पुढे आले पाहिजे.




अलीकडे वारंवार होणाऱ्या दुर्घटनांमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. न्यायालयाने ठाण्यातील बेकायदा इमारतींबाबत कठोर टिप्पणी केली असून, प्रशासन, राजकारणी व नागरिक यांची बेफिकिरी उघड केली आहे. लोकशाहीत जबाबदार व्यवस्था उभी करणे हे प्रशासनाचे काम आहे. त्याऐवजी प्रशासन राजकीय दबावाखाली काम करत आहे. परिणामी, लोक असुरक्षित आहेत आणि मृत्यूनंतरची मदतच हाच एकमेव उपाय बनते आहे, ही अत्यंत दुर्दैवी स्थिती आहे.

अलीकडे अनेक अघटित घटना घडल्या आणि अनेक निष्पापांचे बळी गेले. त्यातल्या दोन -तीन घटना महाराष्ट्रात घडल्या. उपनगरी रेल्वेतील प्रवासी पडून झालेल्या दुर्घटनेची चर्चा संपत नाही तोवर इंद्रायणी नदीवरील पादचारी पूल कोसळला. काही बळी गेले, काही वाहून गेले.

विमान कोसळणे, पर्यटकांवर गोळीबार होणे, स्टेडियमबाहेर चेंगराचेंगरीत चिरडले जाणे अशा घटना 'पुरेशी खबरदारी घेतली असती, तर टाळता आल्या असत्या' असा एक साधारण सूर आहे. लोकांचे जीव अशा पद्धतीने जाणे ही बाब वेदनादायीच. याउपर जिवंतपणी मरणयातना हाही एक समस्या बनू पाहत आहे.

मंगळवारी सर्वोच्च न्यायालयाचा एक जबरदस्त निकाल आला. ठाणे परिसरातील १७ बेकायदेशीर इमारतींचे पाडकाम थांबवण्याची मागणी फेटाळताना सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केलेली मते आपल्या व्यवस्थेची लाज काढणारी आहेत. ठाणे महापालिका प्रशासनाची बेजबाबदार वर्तणूक, नगर नियोजनाचा बोजवारा, खासगी बांधकाम व्यावसायिकांची मनमानी याबाबतची निरीक्षणे भयंकर आहेत. प्रश्न आहे याचा काही परिणाम होईल का? तसेही २०१३ मध्ये मुंब्राच्या लकी कंपाऊंडमध्ये एका बेकायदा इमारतीच्या दुर्घटनेत ७० हून अधिक लोक बळी गेले. त्यातून आपण काय शिकलो?

अनागोंदीचे विषय अनेक आहेत. प्रश्न आहे आमचे नेतृत्व कोणाकडे आहे याचा. अलीकडे दुबईत एका उत्तुंग इमारतीला आग लागली, पण त्यातून काही हजार नागरिकांना सुखरूप बाहेर काढल्याच्या बातम्या आल्या. आपल्याकडे असेच होईल, असे आपण ठामपणे म्हणू शकतो? अशा गोष्टी टाळण्यासाठी एक सक्षम व्यवस्था उभी करणे हे सर्वांचे काम आहे. देशात लोकशाही नव्हती व राजेशाही होती तेव्हा राजे-महाराजेही आपल्या प्रजेची काळजी घेत. याचे किस्से-कहाण्या ऐकिवात, वाचन्यात आल्या आहेत. राजे रात्री, अपरात्री वेशांतर करून फिरत आणि आपल्या भागात काय सुरू आहे याचा कानोसा घेत. अपरात्रीसुद्धा कोणाला दाद मागायची असेल, तर तो घंटानाद करून राजाला जागे करू शकत असे, हेही आपण वाचलेले असते.

आता राजेशाही ऐवजी लोकशाही आहे. म्हणजेच लोकांच्या प्रतिनिधींनी लोकहितासाठी व्यवस्था चालवणे अपेक्षित आहे. त्याचा समतोल रहावा म्हणून कार्यपालिका (प्रशासन) आणि न्यायपालिका (न्यायालये) आहेत. तिघांचे स्वतंत्र स्थान राज्यघटनेने मान्य केले आहे.

१९४७ साली आपण स्वतंत्र झालो, १९५० मध्ये प्रजासत्ताक बनलो, १९५२ मध्ये पहिल्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या. तेव्हा साक्षरता बेताचीच होती. लोकशाहीचे मर्म काय, लोकांचे अधिकार काय, सरकार नावाची व्यवस्था आपलीच असून, आपल्या हिताचे निर्णय घेण्यास भाग पाडणारी परिस्थिती आपण तयार केली पाहिजे. कारभार आपल्या सामूहिक हिताचा, सर्वांच्या प्रगतीचा विचार करून केला जातोय की नाही, हे पाहणे ही आपली जबाबदारी आहे, याचे शिक्षण अत्यंत आवश्यक होते. पण आपण मागे पडलो.

याचा परिणाम असा झाला की, कायदे, नियम पाळणारा जबाबदार, जागरूक नागरिक घडविण्याचे काम स्वातंत्र्याला ७५ वर्षे झाली, तरी पूर्णच होत नाही. ते होत नसल्याने चूक ते चूकच असा काटेकोर विचार रुजत नाही. मग एखादा पूल धोकादायक आहे, असे सांगितले तरी लोक तिथे गर्दी करतात, नदीत पडतात. जबाबदार व्यवस्था तिथे उभारलेला सूचना फलक दाखवते. मग असा पूल तत्काळ का पाडून टाकला नाही आणि नवा का बांधला नाही, याचे उत्तर मात्र येत नाही. एखादी इमारत बेकायदा पद्धतीने बांधली जाताना कोणी पाहत नाही, लोक तिथे घरे घेतात आणि न्यायालयाने त्यावर कारवाई केली तर 'आम्हाला बेघर होण्यापासून वाचवा' अशी मागणी येते.

अशा प्रचंड विस्कळीत व्यवस्थेचा फायदा काही चाणाक्ष लोकांनी घेतला नाही तर नवलच. खरा प्रश्न लोकांच्या जागरूकतेपेक्षा ज्यांच्याकडे विश्वासाने ही व्यवस्था सोपविली, त्यांच्या डोळेझाकीचा आहे. चुकीचे घडताना सरकारी यंत्रणांना समजत नाही, यावर कोणीही विश्वास ठेवणार नाही. लोकांना कमीतकमी त्रास होईल, अशी व्यवस्था, तर ब्रिटिश काळातही होती. लोकांचे हित स्थानिक व्यवस्थेने पाहिले पाहिजे, असा कटाक्ष होता. जिल्हाधिकारी, प्रांत, तहसीलदार यांचे अधिकार आणि कर्तव्य यांचा नीट अभ्यास केला, तर आपले भले होईल. कारण ही मंडळी स्थानिक सरकार होती. गंभीर गुन्हा घडला तरच विषय पोलिसांकडे जात. छोट्या-मोठ्या गोष्टींसाठी न्यायनिवाडा करण्याचे, शांतता-सुव्यवस्थेची हमी देण्याचे, लोकांच्या हक्काचे त्यांना मिळतेय की नाही हे पाहण्याचे अधिकार जिल्हा दंडाधिकारी (जिल्हाधिकारी), उपविभागीय दंडाधिकारी (प्रांत) व तालुका दंडाधिकारी (तहसीलदार) यांना होते. या अधिकारांचा वापर आज होतोय? नसेल तर का? असेल तर त्याची फलनिष्पत्ती काय?

अशा अधिकाऱ्यांनी केवळ कचेरीत बसून काम न करता आपापल्या भागात दौरे करावे, लोकोपयोगी सुविधा, योजना यासह पोलीस ठाणे, तुरुंग याला भेट द्यावी, आढावा घेऊन दुरुस्त्या कराव्यात हे काम अपेक्षित होते. आता याकडे कोणाचे फारसे लक्ष नाही. ते करायचे म्हटले तर त्यांना करू दिले जाईलच याची खात्री नाही. ते का, यावर चर्चा होत नाही.

राजकारणाच्या माध्यमातून सत्तेत आलेल्या लोकांनी हळूहळू आपापले विशेषाधिकार वापरत प्रशासनाचे अधिकार वापरायला कधी सुरुवात केली, हेच लोकांच्या लक्षात आले नाही. प्रशासनानेसुद्धा आपले अधिकार खुशीने राजकीय व्यवस्थेला बहाल केले आहेत असे दिसते. कारण ठाण्यातीलच काय, कोणत्याही बेकायदा बांधकामाची, प्रसंगी ते कोसळण्याची, चेंगराचेंगरीने लोक गेल्याची, नियमबाह्य कामाची जबाबदारी ठरवून जरब निर्माण होईल, अशी शिक्षा झाल्याची किती उदाहरणे आहेत? याउपर 'ही कामे करायला आम्हाला कोणी भाग पाडले', 'डोळेझाक करा' अशा सूचना कोणी दिल्या, हे जर त्यांनी उघड केले तर अनेकांची पंचाईत होईल. त्यामुळे प्रशासनाला जबाबदार धरण्याचे नैतिक धैर्य अनेकांनी गमावले आहे. समांतर व्यवस्था चालवण्याची हौस असल्याशिवाय असे घडणार नाही.

प्रशासनातील लोकांनी नियमानुसार जबाबदारी पार पाडायला सुरुवात केली तर पुढारपण धोक्यात येईल आणि लोक रोज उठून छोट्या-मोठ्या कामांसाठी आपल्या दारात येणार नाहीत. परिणामी, हक्काची मतपेढी तयार करता येणार नाही, या मानसिकतेचा बळी आपली व्यवस्था ठरत आहे.

बेकायदा इमारतीत घर का घेतले, असे न्याययंत्रणा विचारते तेव्हा किमान आपण खरेदीचा व्यवहार नोंदवायला ज्या कचेरीत गेलो, तिथे तरी हे आपल्याला का सांगितले गेले नाही, असा प्रश्न एखाद्याने केला तर काय उत्तर आहे? शाळेत प्रवेश प्रक्रिया झाल्यानंतर कळते की ही शाळाच बेकायदेशीर आहे. अनागोंदीच्या अशा अनेक गोष्टी आहेत.

लोकांना असुरक्षित परिस्थितीत जीवन जगावे लागते, तेही सर्व प्रकारचे शासकीय कर, देणी देऊन. मग ते काटेकोरपणे वसूल करून महागडी व्यवस्था चालवणाऱ्यांची नेमकी जबाबदारी काय? तर लोक किड्या-मुंग्यासारखे मेल्यानंतर आर्थिक मदत वाटप करणे आणि चौकशीची घोषणा करणे, एवढीच? अशा ढिगाने झालेल्या चौकश्यांचे, त्या अहवालांचे काय झाले, हे मात्र विचारायचे नसते. आम्हाला दिशाच सापडत नाही, अशी सध्याची स्थिती आहे.

## सरसकट संशय नको



एअर इंडिया एआय १७१ ची १२ जून २०२५ रोजी अहमदाबाद येथे घडलेली दुर्घटना व झालेली मोठी जीवितहानी संपूर्ण देशासाठी अत्यंत वेदनादायक ठरली. मी स्वतः अहमदाबाद विमानतळावर अधिकारी म्हणून कार्यरत असताना शेकडो सुरक्षित टेक-ऑफ आणि लँडिंग जवळून अनुभवली होती. त्या प्रत्येक यशस्वी उड्डाणाच्या मागे असलेली काटेकोर प्रणाली, तांत्रिक सुसज्जता, प्रशिक्षित मनुष्यबळ, समन्वय व व्यवस्थापन याचा मीदेखील एक भाग होतो. त्यामुळे, जिथे मी प्रवाशांच्या सुरक्षित प्रवासासाठी कार्यरत होतो, तिथेच अशी दुर्घटना घडावी, हे मनाला अत्यंत विचलित करणारे होते. अशा भयानक दुर्घटनेमुळे काहींच्या मनात हवाई प्रवासाबाबत असुरक्षिततेची भावना निर्माण होणे स्वाभाविक आहे. या कठीण प्रसंगी देशातील विविध यंत्रणांनी दाखविलेली तत्परता, शिस्तबद्धता व संवेदनशीलता नोंद घेण्याजोगी आहे. या दुर्घटनेनंतर पंतप्रधान व केंद्रीय गृहमंत्री यांनी सर्व यंत्रणांशी थेट संपर्क साधून बचाव कार्य व समन्वय सुनिश्चित केला. गृह मंत्रालय व गुजरात सरकारने एनडीआरएफ, पोलिस दल, वैद्यकीय पथक, स्थानिक प्रशासनाचा ताफा त्वरित घटनास्थळी पाठविले. नागरी हवाई वाहतूक मंत्रालयाने डीजीसीए, एएआयबीमार्फत प्राथमिक तपास सुरू केला. भारत व गुजरात सरकार, नागरी हवाई वाहतूक मंत्रालय, एअर इंडिया, सर्व संबंधित यंत्रणांनी विलक्षण तत्परता दाखवून सुसूत्रतेने व संवेदनशीलतेने प्रतिसाद दिला. एअर इंडिया व टाटा समूहाने बाधित कुटुंबीयांसाठी हेल्पलाइन, मानसिक आरोग्य आधार सेवा व आर्थिक मदतीची व्यवस्था सुरू केली. स्थानिक प्रशासन, गुजरात सरकार व स्वयंसेवी संस्थांनी देखील तत्काळ प्रतिसाद देत मदतीचा हात पुढे केला. केवळ शोध व मदत कार्यच नव्हे, तर अपघातानंतरची सर्व कार्यवाही आंतरराष्ट्रीय मानदंडांनुसार पार पाडली जात आहेत. ब्लॅक बॉक्सचा झपाट्याने शोध, तपासात अमेरिका, ब्रिटन, बोइंग, जीई व इतर आंतरराष्ट्रीय स्तरावरील संस्थांना सहभागी करणे, संपूर्ण बोईंग ७८७ ताफ्याची तांत्रिक तपासणी सुरू करणे, प्रवाशांच्या कुटुंबीयांसाठी मानवतावादी उपाययोजना करणे या सर्व बाबी भारताच्या पारदर्शकतेचे, जबाबदारीचे आणि जागरूकतेचे प्रतीक आहेत. गृह सचिवांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या एका उच्चस्तरीय समितीच्या शिफारशींवरदेखील सरकार भविष्यातील हवाई सुरक्षेसाठी काटेकोर उपाययोजना राबविणार आहे. भारतात दररोज १५९ विमानतळांवरून ७,५००हून अधिक देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय विमानांची ये-जा होत असते. देशातील विविध भौगोलिक भागांतून उड्डाण करणाऱ्या या विमानांमधून लाखो प्रवासी रोज आपला प्रवास सुरक्षित व निर्धारित वेळेत पूर्ण करीत आहेत. इतका प्रचंड विस्तार असूनदेखील भारताच्या हवाई वाहतूक व्यवस्थेत, प्रवासी विमान अपघातांची शक्यता अगदी नगण्य असते, हे आकडेवारीवरूनदेखील स्पष्ट होते. आयसीएओ, आयएटीए यांसारख्या जागतिक संस्थांच्या मानकांचे पालन करणारे भारतीय विमानतळ, विमान कंपन्या, आधुनिक विमाने व नेव्हिगेशन प्रणाली, प्रशिक्षित वैमानिक, अत्याधुनिक अभियांत्रिकी व तांत्रिक सुसज्जता, प्रशिक्षित व कुशल मनुष्यबळ यांमुळे, गेल्या काही वर्षांत भारताच्या हवाई क्षेत्राची जागतिक स्तरावर सर्वांत वेगाने वाढणारी एक सुरक्षित हवाई बाजारपेठ म्हणून आश्वासक छबी तयार झाली आहे. याचे मोठे श्रेय गेल्या दशकात भारताने नागरी विमान वाहतूक सुरक्षेमध्ये केलेल्या उल्लेखनीय प्रगतीला आहे.

# बिल्डरांसह नगररचना विभागाने गिळले नैसर्गिक नाले

निसर्ग म्हणजे आपल्या बापजाद्याची जायदाद असल्याच्या आविर्भावात महाराष्ट्रातील अनेक बांधकाम व्यावसायिक वागत असतात. पुणे, मुंबईसारख्या महानगरांपासून ते ठाणे, नाशिक, रायगड, पालघरसारख्या इतर जिल्ह्यांपर्यंत पसरलेल्या या नालाभक्षक वृत्तीने शहरी जीवनशैलीला अस्थिर केले आहे. नैसर्गिक नाले म्हणजे पावसाच्या पाण्याला वाहून नेणारा निसर्गाचा स्वतःचा मार्ग. पण हा मार्गच इमारतींच्या पायाखाली गाडला गेला, तर पावसात शहरे बुडणारच! याला जबाबदार बिल्डर आणि त्यांना मदत करणारा नगररचना विभाग आहे.

पावसाळा सुरू झाला की शहरे जलमय होतात, रस्त्यांवर साचलेले पाणी सामान्य माणसाच्या घरात शिरते, रुग्णवाहिका अडकतात, नागरिकांचे जीव धोक्यात येतात. गल्लीबोळापासून मोठ्या रस्त्यांपर्यंत सर्वांनाच जलतरण तलावाचे स्वरूप प्राप्त होते. निसर्ग कोठेही कोपलेला नसतो. ढगफुटीसारखा पाऊस कोठेही बरसलेला नसतो. तरीही नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडलेली असते. गेल्या आठ-दहा वर्षांपासून या नव्या समस्येने जन्म घेतला आहे.

पूरपरिस्थिती उद्भवू नये, यासाठी ठिकठिकाणी तज्ज्ञांच्या निरी समितीमार्फत अभ्यास केला जात आहे. या समित्यांचे अहवाल अभ्यासल्यास त्यात नाल्यांचे रुंदीकरण करणे आणि नाल्यांवरील अतिक्रमणे हटविण्याच्या सूचना जवळपास सर्वच ठिकाणी दिलेल्या दिसतात. पण ही कारवाई ज्या अधिकार्यांकडून होणे अपेक्षित आहे, त्यांचेच हात बरबटलेले असतील तर त्यांच्याकडून काय अपेक्षा करणार? खरेतर, भ्रष्ट, लाचार आणि पैशांभोवती लाळ घोटणारे राज्यकर्ते आणि नोकरशहांच्या पापाचे हे सर्वसामान्यांना मिळालेले कडू फळ आहे.

आपल्या तुंबड्या भरण्याच्या हव्यासापोटी काही भ्रष्ट अधिकारी आणि लालची बिल्डर-भूमाफियांनी महाराष्ट्रभर नैसर्गिक नाल्यांना गिळंकृत करण्याची मोहीम राबवली आहे. त्यांनी केवळ नालेच नाही, तर सर्वसामान्य जनतेच्या सुखद, सुरक्षित जीवनशैलीची गळचेपी केली आहे. मुंबई, ठाणे, पुणे अशा महानगरांपासून ते वसई-विरार, कल्याण, नाशिक, अहमदनगर, पिंपरी चिंचवड, कोल्हापूर, सोलापूर, सांगली, मिरज, सातारा यांसारख्या शहरांपर्यंत जवळपास प्रत्येक ठिकाणी हेच दृश्य दिसते.

नैसर्गिक नाले, जे पावसाचे पाणी मार्गी लावण्याचं निसर्गदत्त काम करत होते, ते कधीच अस्तित्वातून पुसले गेले. बांधकामाच्या नफ्याच्या नशेत जमिनीला सिमेंट-काँक्रिटने झाकून टाकण्यात आले आणि नाले, ओढे, गटारे यांचे मूळ मार्गच संपवण्यात आले. हे नाले गायब झाले तरी कोणी विचारत नाही की हे कोणी केले? त्यातून कोण श्रीमंत झाले? आणि त्याचा फटका कोण भोगतंय? एकही जबाबदार व्यक्ती पुढे येऊन उत्तर देत नाही, कारण दोषीच व्यवस्थेचा भाग आहेत. आज शहरे पाण्यात बुडत असताना सगळी जबाबदारी मात्र बिचाऱ्या नागरिकांवर ढकलली जाते.

आज जमिनीच्या प्रत्येक तुकड्याचा वापर करण्याची स्पर्धा सुरू झाली आहे. नैसर्गिक संपदेवरच मोठमोठी अतिक्रमणे होत आहेत. परिणामी निसर्गनियमाने एरव्ही जमिनीत मुरणारे



पावसाचे पाणी जमिनीच्या पृष्ठभागावरून वाहू लागले. खोलगट भागांत तुंबू लागले. सिमेंटच्या पृष्ठभागावरून वाहणारे पाणी जमिनीवरून वाहणाऱ्या पाण्याच्या चौपट असते, असे एका पाहणीत आढळून आले आहे. नाले बुजवले गेल्याने विहिरीही सुकल्या. अनेक ठिकाणी विहिरी बांधकामासाठी बुजवल्या गेल्या. त्यामुळे पाणी जमिनीत मुरण्याचा आणखी एक मार्ग आकसला.

आणखी एक मोठा परिणाम झाला तो रस्त्यावरील झाडांवर. नैसर्गिक नाले हडप केल्याने पाण्याचे स्त्रोत बंद झाले आहेत. परिणामी जमिनीची झिज होऊन भूजलपातळी मोठ्या प्रमाणात कमी झाली. सर्वाधिक धरणे असलेला आणि कोकणानंतर सर्वाधिक पाऊस पडणाऱ्या नाशिक विभागातील भूजल पातळी राज्यात सर्वाधिक खालावलेली दिसते ती यामुळेच. ती खालावल्याने रस्त्यांवरील झाडांना पाणी मिळणे मुश्किल होते. त्यातून मुळे सुकून त्यांची जमिनीतील पकड ढिली होते आणि मग थोड्याशा वादळ-वाऱ्यांनी ही जुनी झाडं कोलमडून पडतात.

बरं, नैसर्गिक नाले बुजवून त्यावर बांधलेल्या इमारती तरी सुरक्षित आहेत का? काही वर्षांपूर्वी ठाणे येथील शिळफाट्यावर इमारत कोसळून ७५ हून अधिक निष्पाप नागरिकांचा बळी गेला होता. ही इमारतदेखील नैसर्गिक नाल्याचा संकोच करूनच उभारण्यात आल्याचे उघडकीस आले होते. नाल्यांवरील बांधकाम किती धोकादायक आहे, हे यावरून स्पष्ट होते. असं असतानाही केवळ स्वहिताला प्राधान्य देत लोकांचा जीव टांगणीला लावणाऱ्या इमारती नाल्यांवर बांधल्या जाताहेत.

विशेष म्हणजे स्वतःला अभ्यासू आणि समजदार म्हणवणारा प्रतिष्ठितांचा वर्गही अशा नाल्यांवर उभ्या असलेल्या इमारतींत घर घेतो. नैसर्गिक नाले बुजवले गेले असल्याने व सोयीनुसार नाल्याचे प्रवाह बदलून इतरत्र वळवून अनधिकृत बांधकामे केली गेली असल्याने, पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात रस्त्यावर पाणी साचते. पावसाळ्यापूर्वी नाले सफाई व गटारी सफाई वेळेवर होत नसल्याने म्हणावा तसा पावसाळी पाण्याचा निचरा होत नाही, परिणामी शहरातील मुख्य रस्त्यावर पाणी येते. त्यामुळे शहरातील नागरिकांचे जनजीवन विस्कळीत होते.

पालघर शहराचा विकास आराखडा मंजूर करताना शहरात वाहणारे नैसर्गिक ओहळ व नाले यांचा नकाशात अंतर्भाव न झाल्याने त्याचा गैरफायदा घेऊन लगतचे जमीन मालक, विकासक यांच्यामार्फत नाल्याला संरक्षक भिंत उभारून अरुंद करण्याचा घाट घातला. मुळात एखाद्या नाल्यावर बांधकाम करण्याचे 'टोलेजंग' कृत्य चोरून-लपून होऊच कसे शकते? बांधकाम आणि नगररचना विभागातील अधिकार्यांना या बांधकामांविषयी माहिती मिळतच नाही का? किंबहुना नगररचना विभागामार्फतच या बांधकामांना पूर्णत्वाचा दाखला दिला जातो. त्यापूर्वी लेआऊटला मंजुरी दिली जाते.

ही पूर्तता करताना नगररचना विभाग बांधकाम केलेल्या जागेची शहानिशाच करत नाही का? एखादा ले-आऊट मंजूर करण्यापूर्वी भूमापन अधिकारी, मोजणी अधिकार्यांकडून जागेची मोजणी केली जाते. नगररचना विभागाचे अधिकारी, अभियंतेही प्रत्यक्ष पाहणी करतात. नगररचना विभागाच्या दाव्यानुसार नकाशावर ओढे-नाल्यांची नोंद नसली, तरी प्रत्यक्ष पाहणीवेळी ओढे-नाले दिसत नाहीत का? अधिकारी झापड लावून पाहणी करतात का?

काही वर्षांपूर्वी नाशिक महापालिकेच्या प्रशासनाने शहरात २२ नैसर्गिक नाले असल्याची माहिती दिली होती. प्रत्यक्षात अधिकार्यांसमवेत पाहणी केली असता तीनच नाले अस्तित्वात असल्याचे निदर्शनास आले होते. त्यानंतर संबंधितांवर कठोर कारवाई होणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात पावसाचं पाणी जसे ओसरते तसा नाल्यांचा मुद्दाही ओसरतो. अधून-मधून एखादा नगरसेवक यावर आवाज उठवतो. पण व्यवस्था त्याची दखलच घेत नसल्यानं तोही शांत होतो. खरंतर, या 'शांतताप्रिय' व्यवस्थेला वैधानिक मार्गाने जाब विचारण्याची वेळ आली आहे.

नाशिकमधील दीपाली नगर परिसरात एका बांधकाम व्यावसायिकाने थेट महापालिकेच्या नाकावर टिच्चून नैसर्गिक नाल्यावर आणि डीपी रोडवर बांधकाम केले. विशेष म्हणजे या प्रकरणात नगररचना विभागाने स्थगिती आदेश दिला असूनही, संबंधित व्यावसायिकाने त्या आदेशाची निर्लज्जपणे पायमल्ली करत बांधकाम पुढे सुरूच ठेवले. हे सगळं घडत असताना संबंधित अधिकाऱ्यांकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने हा प्रकार उघडपणे संगनमताचा आणि भ्रष्टाचाराचा स्पष्ट पुरावा ठरतो.

नैसर्गिक नाल्यावर झालेले हे अतिक्रमण महापालिकेच्या अधिकृत विकास आराखड्यात स्पष्टपणे दाखवले गेलेले असतानादेखील, त्या ठिकाणी बांधकाम परवानगी देणे, प्रत्यक्षात डीपी रोडवरच इमारत उभारणे आणि त्यानंतरही प्रशासनाचे मौन हे नुसतं संशयास्पद नाही, तर थेट सहभाग दर्शवणारे आहे. अशी कितीतरी प्रकरणे आज नाल्यागत काळाच्या पडद्याआड झाकली गेली आहेत.

तसे पाहता राज्यातील सर्वाधिक चाणाक्ष 'प्रजातीचे' अधिकारी कोणते असतील तर ते म्हणजे नगररचना अधिकारी. अतिशय भ्रष्ट पद्धतीने ते कारभार हाकत असतानाही त्यांच्यावर कोणतीही कायदेशीर कारवाई केली जात नाही यातच सारे आले. वरपासून खालपर्यंतची सर्वच व्यवस्था या भ्रष्टाचाराच्या गंगेत नखशिखांत न्हालेली असते. त्यामुळे कारवाई कुणी कोणावर करावी असाही प्रश्न उपस्थित होतो.

नगररचना विभागाच्या अधिकाऱ्यांना शहरात खुट्टं वाजले तरीही त्याची खबर असते. असे असताना नालेच्या नाले बुजवून त्या ठिकाणी टोलेजंग इमारती बांधल्या जातात, तेव्हा या मंडळींना त्याची खबर लागत कशी नाही? स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी ही मंडळी धृतराष्ट्राच्या भूमिकेत जाऊन इमारतींना बिनदिक्कत परवानगी देतात. त्यावर आवाज उठवणाऱ्यांना चिरीमिरी देऊन गप्प केले जाते वा त्याच्या जीवावर उठतात.

बऱ्याच ठिकाणी नैसर्गिक नाल्यांचे काँक्रीटच्या गटारींत रुपांतर करण्यात आले आहे. परिणामी थोड्या पावसात या गटारी तुडूंब भरुन पाणी नागरी वस्त्यांमध्ये शिरते. अधिकाऱ्यांना याबाबत विचारणा केल्यावर ते आपल्यावर राजकीय दबाव असल्याचे खासगीत सांगतात. तर राजकारणी अधिकार्यांवर खापर फोडून मोकळे होतात. वास्तविक, अधिकारी आणि राजकारणी हे दोघे एकाच माळेचे मणी आहेत. त्यांना लोकांच्या टाळूवरचे लोणी खाण्यातच अधिक 'इंटरेस्ट' असतो. त्यामुळे लोक मेलेत तरी चालतील आमच्या तुंबड्या तेवढ्या भरायला हव्यात या एकमेव 'तत्वाने' ते कारभार हाकत असतात.

या अधिकाऱ्यांवर राजकीय दबाव असतो वगैरे बाबींमध्ये तथ्य असले तरीही नियमबाह्य कामे केल्यास भविष्यात कारवाईची कायमस्वरुपी टांगती तलवार असेल ही बाब अधिकारी लक्षात कशी घेत नाहीत? व्यवस्थेवर त्यांचा इतका विश्वास असतो की, काहीही केले तरी कारवाई होणारच नाही हे त्यांना माहीत असते.

सगळ्यांचेच हात याखाली दबलेले असल्याने त्यावर कारवाई करायला कुणी धजावणार नाही, असा आत्मविश्वास या मंडळींना असतो. पण काळ बदललेला आहे. कुणी कितीही मोठा असला तरी त्याने केलेलं कृत्य कायमस्वरुपी लपले जाईल असा हा काळ मुळीच नाही. वरिष्ठांचा कितीही दबाव असला तरी नियमाकडे बोट दाखवून ही बेकायदेशीर कामे नाकारता येणार नाहीत.

सर्वसामान्यांना छोट्या-मोठ्या बांधकामाच्या परवानग्या घेण्यासाठी मोठी कसरत करावी लागते. जीवाचं रान करत कागदपत्रे गोळा करावी लागतात. त्याने स्वतःच्याच जागेत थोडंफार वाढीव बांधकाम केले तर ते तातडीने हटवले जाते. त्यात काही वावगंही नाही. परंतु सर्वसामान्यांना नियमाच्या तराजूत तोलणारे प्रशासन नैसर्गिक नाल्यांवर इमारती बांधल्या जात असताना मूग गिळून गप्प का बसते?

ते हटवण्यासाठी कुणी पुढे का येत नाही? लोकांना भविष्यात सुखाने जगायचे असेल तर यापुढे काळजावर दगड ठेऊन यंत्रणेला आता काही कठोर निर्णय घ्यावे लागणार आहेत. नैसर्गिक नाले हडप करणारे भूमाफिया, बिल्डर्स आणि त्यांच्या पापात भागीदार असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांना तुरुंगाची हवा खायला पाठवायला हवं. इतक्यानेच प्रश्न मिटणार नाही, तर ज्या-ज्या ठिकाणी नाल्यांवर इमारती उभ्या आहेत, त्या इमारतींवर जेसीबी फिरवायला हवा. अशा इमारती आज नियमित केल्या तर उद्या पावसाचे पाणी पहिल्या-दुसऱ्या मजल्यापर्यंत पोहचलेच समजा.

## पावटा खिचडी



**साहित्य** : ओले पावटे, तांदूळ, ओला लसूण, हिरवी मिरची, आले, कोथिंबीर, कांदा, तूप, अख्खा गरम मसाला, गोडा मसाला, गुळ, हळद, मीठ.

**कृती** : ओले पावटे हळद मीठ घालून किंचित उकडून घ्यावेत. १ वाटी तांदूळ धुवून, निथळवून घ्यावा. ओला लसूण, हिरवी मिरची, आले, कोथिंबीर याचे वाटण करून घ्यावे. कांदा चिरून घ्यावा. तूप गरम करून त्यात अख्खे मसाले घालून, परतून मग त्यात कांदा घालावा. ते लालसर झाल्यावर त्यावर हिरवे वाटण घालून परतावे. तांदूळ आणि पावटे घालून पुन्हा परतून घ्यावे. गोडा मसाला, गुळ, मीठ घालून दोन वाट्या पाणी घालावे. बाजूने थोडे तूप सोडावे. कुकरमध्ये शिट्टी काढावी. पावटाभात तयार आहे.

# ॲलर्जी असणाऱ्या त्वचेसाठी मेकअप

**त्वचा संवेदनशील असेल तर अनेक अडचणींना तोंड द्यावं लागतं. कोणतंही मेकअप प्रॉडक्ट वापरण्यापूर्वी त्याचं त्वचेवर परीक्षण करणं गरजेचं ठरतं. ॲलर्जीमुळे अनेक मेकअप प्रॉडक्ट वापरणं अवघड होऊन बसतं. ॲलर्जिक त्वचेचा मेकअप कसा करावा याविषयी...**





■ ॲलर्जिक त्वचा असणाऱ्या व्यक्तींनी मेकअपची सुरुवात क्लिंजिंग आणि मॉइश्चरायझिंगने करावी. त्यानंतर फाऊंडेशनचा अत्यंत पातळ थर लावून घ्यावा.

■ नंतर चीकबोन्सच्या थोडं खाली, नाकाच्या दोन्ही बाजूला आणि कपाळाच्या बाजूंना ब्रोंजर लावा. नाकाला अधिक उठाव येण्यासाठी कॉंट्यूर मेकअप करा.

■ ॲलर्जिक त्वचा असणाऱ्यांनी डोळ्यासाठी मेकअपची उत्पादनं खरेदी करताना सावधगिरी बाळगावी.

■ टिश्यू आणि मेकअप ब्रशचा वापर टाळण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करावा. त्याऐवजी सुती रुमालाचा वापर करावा.

■ ॲलर्जीमध्ये डोळ्याखालच्या त्वचेवर सर्वात जास्त परिणाम होतो. त्यामुळे रात्री झोपण्यापूर्वी अंडर आय क्रीम लावावं.

■ कोणत्याही उत्पादनाचा वापर करण्यापूर्वी ते तुमच्या त्वचेसाठी कितपत उपयोगी ठरेल याची माहिती घ्या.

■ ॲलर्जिक स्कीन असणाऱ्यांनी शक्यतो स्वतःचे मेकअप प्रॉडक्ट इतरांबरोबर शेअर करू नयेत.

**भात खाल्ल्याने वजन वाढते, पोट सुटते म्हणून तुम्हीही भात खाणे टाळता का? मग भातासंबंधित असलेले तुमचे समज-गैरसमज दूर करण्याची गरज आहे. सेलिब्रेटी न्यूट्रिशनिस्ट ऋजुता दिवेकर सांगते आहे वरण-भात खाण्याचे महत्त्व आणि फायदे...**

# 'या' फायद्यांसाठी आहारात भाताचा अवश्य समावेश करा!

**हृदयाचे आरोग्य जपण्यासाठी**

वरण भात खाल्ल्याने तुमच्या हृदयाचे आरोग्य चांगले राहते. तर ब्लड शुगर नियंत्रित राहते. इतकंच नाही तर वरण भात पचायलाही हलका असतो. त्याचबरोबर रात्रीची झोपही नीट येण्यास मदत होते. तसंच भात खाल्ल्याने पोटातील आतडे मजबूत होतात आणि बद्धकोष्ठतेची समस्या दूर होण्यास मदत होते.

**विविध फायदे**

भातात अमिनो ॲसिड भरपूर प्रमाणात असते. जे मेंदूच्या आरोग्यासाठी फायदेशीर असते. याचा प्रभाव मसल्सवरही होतो. वर्कआऊट करत असाल तर भात खाणे लाभदायी आहे.कारण भात खाल्ल्याने वर्कआऊटचे परिणाम लवकर दिसून येतात. भातात मेथिओनिन, व्हिटॅमिन बी१ आणि रेजिस्टेंट स्टार्च असतात. मेथिओनिनमध्ये असलेल्या अमिनो ॲसिडमध्ये सल्फरचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे त्वचेच्या अनेक समस्या दूर होण्यास मदत होते. त्याचबरोबर वाढत्या वयाचा परिणाम कमी करण्यासाठीही भात खाणे फायदेशीर ठरते.

**त्वचेसाठीही फायदेशीर**

लिव्हरमधील विषद्रव्य (टॉक्झिन्स) बाहेर टाकण्यासही मदत होते. चेहऱ्यावर येणाऱ्या सुरकुत्या, केस पांढरे होणे यावर उपाय म्हणूनही भात खाल्ला जातो. कॅन्सर सारख्या दुर्धर आजारावर देखील भात खाणे फायदेशीर ठरते.




# जीवनशैलीतील 'या' बदलांमुळे तुम्ही निरोगी दीर्घायुषी व्हाल!

**रात्री झोपण्यापूर्वी अनेक जण सकाळी लवकर उठून व्यायाम करण्याचा विचार करतात. मात्र सकाळी लवकर उठणे शक्य होत नाही. आपल्या धकाधकीच्या आणि गुंतागुंतीच्या जीवनशैलीचा आपल्या आरोग्यावर वाईट परिणाम होत आहे. त्यामुळे या धावपळीतून स्वतःसाठी वेळ काढणे गरजेचे आहे. तर आपल्या जीवनशैलीत काही लहान सहान बदल केल्यास तुम्हाला निरोगी दीर्घायुष्य लाभेल. पाहुया काय आहेत ते बदल...**

**शारीरिक हालचाली बंद करू नका :** वाढत्या वयानुसार अवयवांचे काम करणे काहीसे मंदावते. पण तुम्ही थांबू नका. हालचाल, काम करणे बंद करू नका. जिने चढा. चाला, फिरा. असा काहीना काहीतरी शारीरिक हालचाली चालू राहू द्या. त्यामुळे रक्तप्रवाह सुरळीत होईल.

**वजन नियंत्रित ठेवा :** सात्त्विक, संतुलित आहार घ्या. त्यामुळे वजन गरजेपेक्षा अधिक वाढणार नाही. आहारात हिरव्या पालेभाज्या, फळे यांचा समावेश करा. मांसाहारी पदार्थ तुम्हाला आवडत असतील तर जरूर खा. पण त्याचा अतिरेक टाळा. त्याचबरोबर दूध, अंडी अवश्य खा. त्यामुळे शरीराला प्रोटीन्स भरपूर प्रमाणात मिळतील. अशा संतुलित आहाराने शरीराचे वजन नियंत्रित राहील.

**आनंदी रहा :** घरी किंवा ऑफिसमध्ये नेहमी गंभीर राहणे गरजेचे नाही. तुम्ही कुटुंबातील सदस्यांसोबत, मित्रमंडळींसोबत हसत खेळत राहू शकता. त्यामुळे तुमचे शरीर-मन रिलॅक्स होईल. थकवा दूर होईल आणि तुम्ही प्रसन्न रहाल.

**भावना शेअर करा :** भावभावना, अनुभव शेअर केल्याने मन मोकळे होते. भावना, विचारांचे आदान प्रदान झाल्याने नवीन काही शिकायला मिळते.



# अँड्रॉइड फोनवर अनोळखी नंबर्स ब्लॉक करण्याची ही आहे सोपी पद्धत

**अँड्रॉइड फोनवर अनोळखी नंबर्स ब्लॉक करण्याची एक सोपी पद्धत पाहूया, ज्यामुळे तुमच्या फोनवर येणारे अनावश्यक आणि अनोळखी कॉल्स थांबवता येतात.**

अनोळखी फोन नंबर अनेकदा डोकेदुखी ठरू शकतात. त्यामुळे जर तुम्हाला अँड्रॉइड फोनवर अनावश्यक आणि अनोळखी नंबर्स ब्लॉक करायचे असतील तर आम्ही तुम्हाला त्याची एक सोपी पद्धत सांगणार आहोत. गुगलच्या फोन ॲपवर बाय डिफॉल्ट एक पद्धत उपलब्ध आहे. परंतु इतर कंपन्यांची पद्धत वेगवेगळी आहे.

आम्ही तुम्हाला अँड्रॉइड फोनवर अनोळखी नंबर्स ब्लॉक करण्याची पद्धत सांगणार आहोत, ज्याची सुरुवात गुगल फोन ॲपपासून करून जे गुगल पिक्सल वनप्लस आणि नोकियाच्या स्मार्टफोन्समध्ये आधीपासून इंस्टॉल करण्यात आलेलं असतं. तुम्ही हे गुगल प्ले स्टोअरवरून देखील तुमच्या अँड्रॉइड डिव्हाइसवर डाऊनलोड करू शकता. आम्ही या आर्टिकलमध्ये सॅमसंग आणि शाओमी फोनवरदेखील अनोळखी नंबर ब्लॉक करण्याची पद्धत सांगितली आहे.

### गुगल फोन ॲपवर अनोळखी नंबर कसे ब्लॉक करायचे

- गुगल फोन ॲप असलेल्या अँड्रॉइड फोनवर अनोळखी नंबर ब्लॉक करण्यासाठी :
- फोन ॲप ओपन करा.
- डायलर सर्च बारच्या वरच्या बाजूला उजवीकडे थ्री डॉट बटन प्रेस करा.
- सेटिंग्सवर टॅप करा आणि ब्लॉक्ड नंबर वर जा.
- अननोन ऑप्शन टर्न ऑन करा.

लक्षात असू द्या अँड्रॉइडमध्ये अननोनचा अर्थ ते नंबर्स नव्हे जे तुमच्या फोनमध्ये सेव्ह केले गेले नाहीत. तर त्याचा अर्थ जे तुमच्या कॉलर आयडीमध्ये प्रायव्हेट किंवा अननोन म्हणून फ्लॅश होतात.

# 'ड' जीवनसत्त्व आणि कॅल्शियमचे सप्लिमेंट्स घेतल्याने फ्रॅक्चर्स टाळता येऊ शकतात का?

**हाडांचे** आरोग्य चांगले राहावे, याकरिता कॅल्शियमच्या सप्लिमेंट आपण घेतो, आणि आपण घेत असलेले कॅल्शियम शरीरामध्ये शोषले जावे याकरिता 'ड' जीवनसत्त्वाचे सप्लिमेंटदेखील आपण घेत असतो. ही दोन्ही तत्त्वे आपल्या शरीरातील हाडांच्या आरोग्याच्या दृष्टीने जरी महत्त्वाची असली, तरी प्रसंगी एखाद्या लहानशा अपघातामुळे किंवा पडल्याने होणारी हाडांची फ्रॅक्चर्स या सप्लिमेंट्समुळे टाळता येऊ शकत नसल्याचे नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका शोधनिबंधात म्हटले आहे. हा शोधनिबंध जर्नल ऑफ अमेरिकन मेडिकल असोसिएशनतर्फे प्रसिद्ध करण्यात आला आहे. ज्या व्यक्तींना ऑस्टियोपोरोसिस आहे, म्हणजेच ज्या व्यक्तींची हाडे ठिसूळ झालेली आहेत, त्यांची हाडे अगदी लहानशा अपघातानेदेखील फ्रॅक्चर होऊ शकतात. हाडांची झीज कमी व्हावी याकरिता अशा व्यक्तींना कॅल्शियम आणि 'ड' जीवनसावाची सप्लिमेंट दिली जातात. पण या सप्लिमेंटचा उपयोग फ्रॅक्चर होण्यासाठी कितपत होऊ शकतो याबद्दल शास्त्रज्ञांच्या मिश्र प्रतिक्रिया आहेत. या अनुषंगाने चीनमधील तिआनजिन हॉस्पिटलमधील शास्त्रज्ञांनी एक सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणाअंतर्गत, पन्नास वर्षे वयापेक्षा जास्त वय असणाऱ्या वृद्ध व्यक्तींचे निरीक्षण करण्यात आले. या सर्व व्यक्ती 'ड' जीवनसत्त्व व कॅल्शियम सप्लिमेंट घेणाऱ्या होत्या. या व्यक्तींच्या चाचण्या करण्यात येऊन, त्याद्वारे हे निदान करण्यात आले की, 'ड' जीवनसत्त्व व कॅल्शियमच्या सप्लिमेंट घेऊनदेखील या व्यक्तींना एखाद्या इजेमुळे हाडे फ्रॅक्चर होण्याची शक्यता होती.

# अळशीचे सात आरोग्यदायी फायदे

**पूर्वीपासूनच** आहारात अळशीचा समावेश करण्याची आपली परंपरा आहे. अळशीत व्हिटॅमिन बी १, प्रोटीन, मॅग्नेशियम, ओमेगा-३ फॅटी ॲसिड ही पोषकतत्त्वे मुबलक प्रमाणात असतात. त्यामुळे आरोग्यास काय फायदा होतो जाणून घेऊया...



■ अळशीमध्ये ओमेगा फॅटी ॲसिड आणि फायबर्स भरपूर प्रमाणात असतात. त्यामुळे मधुमेह, कॅन्सर आणि हृदयविकाराचा धोका कमी होतो.

■ अळशीच्या सेवनाने ब्रेस्ट कॅन्सर आणि कोलोरेक्टल कॅन्सर होण्याची संभावना कमी होते. अळशीत ओमेगा-३ फॅटी ॲसिड मुबलक प्रमाणात असल्याने ट्युमर होण्यापासून आणि वाढण्यापासून संरक्षण होते.

■ अळशीच्या सेवनाने कोलेस्ट्रॉल नियंत्रित राहते. लावा स्टेट युनिव्हर्सिटीच्या न्यूट्रीशन डिपार्टमेंट रिसर्चनुसार असे सिद्ध झाले आहे की, शरीरातील कोलेस्ट्रॉलची मात्रा कमी करण्यासाठी अळशी उपयुक्त ठरते.

■ मासिक पाळीत होणाऱ्या त्रासावर अळशी फायदेशीर ठरते.

■ अळशीमुळे ब्लड शुगर नियंत्रित राहते.

■ अळशीमुळे वजन नियंत्रित राहण्यास मदत होते.

■ अळशीमुळे बद्धकोष्ठतेची समस्या दूर होते.

# या घरगुती उपचारांनी केस बनवा चमकदार

**वर्षातील प्रत्येक बदलत्या ऋतूमध्ये केसांची देखभाल करण्याची पद्धत देखील बदलावी लागते. उन्हाळा असो किंवा पावसाळा, प्रत्येक ऋतूमध्ये आपल्या केसांची निगा घ्यायला हवी. त्याकरिता आपण सर्वच जण आपापल्या परीने प्रयत्न करत असतो. कधी महागडे शाम्पू वापरून, तर कधी ब्यूटी पार्लरमधील महागड्या हेअर स्पा ट्रीटमेंट घेऊन, तर कधी परंपरेने चालत आलेले उपाय अमलात आणून, आपण आपल्या केसांची योग्य निगा राखण्याचा प्रयत्न करत असतो. पण आजकाल बदलते हवामान, प्रदूषण, केसांसाठी वापरली जाणारी रसायनयुक्त प्रसाधने वापरल्याने केस अकाली पांढरे होणे, गळणे इत्यादी तक्रारी उद्भवतात. या तक्रारी दूर करण्यासाठी आणि केस नेहमी सुंदर आणि चमकदार दिसण्यासाठी काही घरगुती उपाय करून बघता येतील.**



**कांद्याचा रस :** कांद्याच्या रसामध्ये सल्फर मोठ्या प्रमाणात असते. सल्फरमुळे कोलाजेन वाढून केसांची वाढ चांगली होण्यास मदत मिळते. हा उपाय करण्याकरता एक कांदा किसून तो पिळून घ्यावा. हा रस दहा मिनिटे केसांच्या मुळांशी लावून ठेवावा. त्यानंतर केस कोमट पाण्याने आणि शाम्पूने स्वच्छ धुवावेत. कांद्याच्या रसाचा वास केसांमधून निघाला नाही, असे वाटत असल्यास पुन्हा एकदा हलका शाम्पू वापरावा. कांद्याच्या रसाप्रमाणेच बटाट्याचा रसही केसांसाठी चांगला आहे. बटाटा किसून घेऊन पिळून घ्यावा आणि तो रस केसांना लावावा. दहा मिनिटांनी केस धुऊन टाकावेत.

**नारळाचे दूध :** नारळाच्या दुधामध्ये लोह, पोटॅशियम आणि फॅट्सची मात्र असते. या तीनही गोष्टी केसांसाठी अतिशय उत्तम आहेत. मात्र केसांना लावण्यासाठी ताजा नारळ खवून त्याचे दूध काढून घ्यावे. बाजारातून आणलेले तयार नारळाचे दूध शक्यतो वापरू नये. नारळाच्या दुधामध्ये अर्ध्या लिंबाचा रस घालावा आणि तीन-चार थेंब लॅव्हेंडरचे तेल घालावे. हे मिश्रण चार ते पाच तासांसाठी केसांना लावून ठेवावे. त्यानंतर कोमट पाण्याने आणि शाम्पूने केस धुवावेत.

**आवळा :** आवळा केसांकरिता अतिशय फायदेशीर आहे. यामध्ये असलेले 'क' जीवनसत्त्व केसांच्या आरोग्याकरिता अतिशय लाभकारी आहे. केसांना लावण्याकरिता आवळ्याचे तुकडे करून ते वाळवावेत, आणि त्याची पूड करावी. आवळ्याची तयार पूड बाजारातही उपलब्ध आहे, तिचाही वापर करता येईल. दोन लहान चमचे आवळ्याची पूड घेऊन त्यामध्ये दोन चमचे लिंबाचा रस घालावा. हे मिश्रण केसांना लावावे, व ते वाळेपर्यंत केसांवर राहू द्यावे. त्यानंतर शाम्पू आणि कोमट पाणी वापरून केस धुवावेत.



**ॲपल सायडर व्हिनेगर :** ॲपल सायडर व्हिनेगरमुळे केसांचा PH स्तर नियंत्रित राहतो. जर केस लांब असतील, तर एक लिटर पाण्यामध्ये ७५ मिलीलिटर ॲपल सायडर व्हिनेगर घालावे आणि केस लहान असतील, तर एक कप कोमट पाण्यामध्ये १५ मिलीलिटर सायडर व्हिनेगर घालावे. शाम्पूने केस धुतल्यानंतर सगळ्यात शेवटी या पाण्याने केस धुवावेत. यामुळे केस चमकदार होतीलच, शिवाय केसांची लांबी वाढण्यासही मदत होईल.

**अंड्यातील पांढरा भाग :** अंड्यातील पांढरा भाग केसांसाठी लाभकारी असतो. यामध्ये प्रथिने, सल्फर, लोह, झिंक, सेलेनियम, आयोडीन आणि फॉस्फरस असल्याने केसांच्या वाढीकरिता याचा चांगला उपयोग होतो. अंड्यातील पांढरा भाग एका भांड्यामध्ये काढून चांगला फेटून घ्यावा. यामध्ये एक लहान चमचा ऑलिव्ह ऑईल घालावे.



ऑलिव्ह ऑईलऐवजी ग्रेपसीड ऑईल किंवा लॅव्हेंडर ऑईलही वापरता येईल. या मिश्रणामध्ये एक लहान चमचा मध घालून हे मिश्रण चांगले फेटून घ्यावे आणि आपल्या केसांना वीस मिनिटे लावून ठेवावे. त्यानंतर थंड पाण्याने व शाम्पूने केस धुवावेत. अंड्यातील पांढरा भाग केसांसाठीच नाही, तर त्वचेसाठी देखील अतिशय चांगला आहे.

**मेथी :** मेथीचे दाणे किंवा मेथ्या केसांचा नैसर्गिक रंग टिकवून ठेवण्यास मदत करतात. यामध्ये असलेली प्रथिने आणि निकोटिनिक ॲसिड केसांकरिता अतिशय फायदेशीर आहेत. मेथी दाणे केसांकरिता वापरण्यासाठी मेथी दाणे काही तास थोड्याशा पाण्यामध्ये भिजवून ठेवावेत. पाण्यामध्ये ठेवल्याने मेथी दाणे फुगतात. त्यानंतर हे मेथी दाणे मिक्सरवर वाटू घेऊन त्याची पेस्ट बनवून घ्यावी. या पेस्टमध्ये थोडेसे खोबरेल तेल मिसळावे आणि हे मिश्रण केसांना अर्धा तास लावून ठेवावे. त्यानंतर केस शाम्पूने धुऊन टाकावेत. मेथी दाण्यांमुळे केसांचे आरोग्य आणि नैसर्गिक रंग टिकून राहण्यास मदत मिळते.

**ग्रीन टी :** आपले आरोग्य सांभाळण्याकरिता आपण ग्रीन टीचा वापर करत असतो. हा ग्रीन टी आपल्या एकंदर आरोग्याकरताच नव्हे, तर केसांकरताही चांगला आहे. ग्रीन टीमध्ये अँटी ऑक्सिडंट्स मुबलक मात्रेमध्ये असतात. यामुळे केस चमकदार तर होतीलच, शिवाय केसांच्य मुळांना पोषण मिळून केस गळण्याचे प्रमाणही कमी होते. ग्रीन टी केसांकरता वापरण्यासाठी ग्रीन टी कोमट करून केसांना तासभर लावून ठेवावे. त्यानंतर थंड पाण्याने केस धुऊन टाकावेत.

## बागेतले औषध
# गवती चहा

**आले** आणि गवती चहा घालून केलेला चहा अनेक छोट्या-मोठ्या तक्रारींवरचा रामबाण उपाय आहे. सर्दी, डोकेदुखी, अंगातली बारीक कणकण घालवण्यासाठी हा सर्वोत्तम उपाय म्हणावा लागेल. गवती चहाला पातीचा चहा असेदेखील म्हणतात. याला एक विशिष्ट सुगंध असतो. घाम येऊन तापाचा निचरा होण्यासाठी गवती चहा विशेष गुणकारी आहे. गवती चहा, सुंठ, मिरे आणि दालचिनी यांचा अष्टमांश काढा घेतल्याने सर्दी-पडसे, थंडी वाजून ताप येणे आदी विकार नाहीसे होतात. तापात घाम येण्यासाठी गवती चहाचा वाफारा दिला जातो. हा वाफारा घेतल्यास ताप झटक्यात कमी होतो आणि अंगदुखी थांबते. गवती चहापासून तेलही काढतात. हे तेल संधिवात आणि वाताने अंग दुखण्यावर अत्यंत गुणकारी आहे. हे दुखणे असणाऱ्या व्यक्तींनी सकाळ-संध्याकाळ गवती चहाच्या तेलाने मालीश केल्यास संधिवात बरा होतो, अंगदुखी थांबते. गवती चहा कॉलराचा प्रतिबंध करण्यासाठीदेखील वापरला जातो.



# प्रसन्न राहण्यासाठी करा 'हे' उपाय



अनेक जण दैनंदिन कामांमुळे थकून जातात. या थकव्यावर नेमका काय उपाय करावा हे न कळल्याने मग हा त्रास अंगावर काढला जातो. पण रोजची कामे करताना प्रसन्न राहणे शक्य आहे. त्यासाठी काही गोष्टींत नियमितता ठेवल्यास हे नक्कीच साध्य होऊ शकते. वजन कमी करणे, ताकद वाढवणे, शरीराची लवचिकता वाढवणे, त्वचा टवटवीत ठेवणे, त्याचबरोबर मन प्रसन्न ठेवणे व आरोग्याची काळजी घेणे ही काळाची गरज आहे. दिवसातील सर्वाधिक काळ घराबाहेर असल्याने आपण ताजेतवाने राहण्यासाठी योग, प्राणायाम आणि ध्यान यांची नक्कीच मदत घेऊ शकतो. योग या गोष्टीकडे आजही फक्त व्यायाम प्रकार म्हणून पाहिले जाते. पण प्रत्यक्षात त्याही पलीकडे जात योग हा यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, समाधी या आठ गोष्टींनी मिळून बनलेला आहे.

योगाभ्यासात 'जीवनशैली कशी असावी' हे समजावले आहे. यामुळे व्यक्तीचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते. यामुळे मानसिक आणि शारीरिक आरोग्य निरोगी राहण्यास मदत होते. योगाचे विविध प्रकार, प्राणायाम, सात्त्विक आहार, ध्यान याने जीवन सुखकर होते. योगासनांमुळे जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन तयार होतो. मन स्थिर होण्यास मदत होते. मनाची चंचलता, नकारात्मकता कमी होते. त्यामुळे २१व्या शतकातील ताणतणावांना आणि स्पर्धेला सामोरे जाण्यासाठी याचा चांगला उपयोग होतो.

**योग :** योगासने योगाचा एक अष्टमांश भाग आहे. योग म्हणजे चित्त वृत्तीचा निरोध करणे. वृत्ती म्हणजे काय? त्यावर नियंत्रण ठेवायचे म्हणजे याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

**प्राणायाम (श्वसनाचा व्यायाम) :** प्राण म्हणजे जीवन शक्ती, आयाम म्हणजे तिला नियंत्रित करणे, श्वासाची गती जर कमी केली तर आयुष्य तेवढे जास्त. ही श्वासाची गती जर कमी करायची असेल तर प्राणायाम करणे गरजेचे आहे. श्वास कसा घ्यावा, संथ श्वसन, दीर्घ श्वसन कसे करावे, कोणी व कधी करावे याला महत्त्व आहे. प्रत्येक व्यक्तीसाठी प्राणायाम वेगवेगळे असतात. आपले शरीर अन्न, पाणी याशिवाय काही काळ राहू शकते, पण प्राणवायूशिवाय नाही. जसे व्यायामाने शरीरावर सकारात्मक बदल घडतात तसेच प्राणायामामुळे शरीर, मन आत्मा यामध्ये सकारात्मक बदल घडून ते बळकट होतात.

**आहार :** आपण काय खातो, कसे व केव्हा खातो, याला जीवनशैलीमध्ये महत्त्व असायला हवे. कारण खाण्याचा शरीरावर तसेच मन व विचारांवर परिणाम होतो. जसे अन्न घेऊ तसे विचार घडत जातात. यामुळे आहारालासुद्धा तितकेच महत्त्व असायला हवे. आपण कुठल्या प्रदेशात राहतो, राज्य कोणते, तिथले हवामान कसे आहे, यावरून आपला आहार ठरतो. विज्ञानाची प्रगती माणसाला सुखी करण्यासाठी होत आहे. पण त्याच्या अयोग्य वापरामुळे मानव अधिक तणावपूर्वक आयुष्य जगत आहे. जग जास्त जवळ आले, माणसातील संवाद वाढले, लोक एकमेकांशी जोडले गेले. जवळची माणसे लांब व लांबचे लोक जवळ आले. माणसांचे त्रास वाढले, कष्ट कमी झाले, पण माणूस असमाधानी होत गेला. मनावरील ताण वाढला व त्याचा परिणाम शरीरावर, वाढते वजन, गुडघेदुखी, डोकेदुखी, पाठदुखी अशा छोट्या त्रासापासून मधुमेह, उच्च रक्तदाब, कॅन्सर, त्वचेचे रोग, अल्सर, ॲसिडिटी असे अनेक विकार जडत जातात. म्हणजेच प्रत्येक व्याधीला 'मन' कारणीभूत असल्याचे दिसते. या सर्व त्रासासाठी आहार, विहार, व्यायाम, विचार यात बदल करणे आवश्यक असून योगाभ्यास हा या सगळ्यावरील उत्तम उपाय ठरू शकतो.

# ‘रेल्वे, नद्या, रस्ते सगळेच या राज्यात...’
# ‘निर्घृण सरकारचे बळी’ म्हणत ठाकरेंच्या सेनेची आगपाखड

**मुंबई** : ‘‘देशात आणि महाराष्ट्रात एकापाठोपाठ एक अशा दुर्घटनांची मालिका सुरू आहे. स्वतःला ‘विकास पुरुष’, ‘जनतेचे तारणहार’ वगैरे म्हणवून घेणाऱ्यांची हवा त्यामुळे निघाली आहे. दुर्घटना घडत आहेत. त्यात माणसांचे बळी जात आहेत हा सरकारचा नाकर्तेपणा आहे. महाराष्ट्रावर तर मोठीच आफत आली आहे. मावळ तालुक्यातील कुंडमळ्यात इंद्रायणी नदीवरील लोखंडी पूल कोसळला. त्यात किमान 35-40 पर्यटक वाहून गेल्याचे वृत्त धक्कादायक आहे. पूल जुना होता. त्याच्यावर पर्यटकांनी गर्दी केली. भार जास्त झाल्याने तो कोसळला. याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांनी तीव्र दुःख व्यक्त करून हे कसे घडले याबाबत चौकशीचे आदेश दिले. मुख्यमंत्र्यांचे दुःख, चिंता, चौकशीचे आदेश हे एक ढोंग आहे. मगरीचे अश्रू आहेत,’’ असं उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेनं म्हटलं आहे.

**हा सदोष मनुष्यवधाचाच अपराध**

‘‘मुख्यमंत्र्यांचे खजिनदार गिरीश महाजन हे अशा दुर्घटनांची जणू वाटच पाहतात. दुर्घटना झाली की, लगेच ते मृत आणि जखमींच्या कुटुंबीयांना पाचेक लाखांची मदत जाहीर करतात. सरकारी हलगर्जीपणामुळे जे जीव जातात त्या जिवांची किंमत गिरीश महाजन प्रत्येकी पाच लाख ठरवतात, पण जीव का जात आहेत? कोणामुळे जात आहेत? या प्रश्नांची उत्तरे कोण देणार? इंद्रायणी नदीवरील पूल जुना झाला. तो नव्याने बांधण्यासाठी सरकारने आठ कोटी रुपये मंजूर केले. हे आठ कोटी कागदावरच राहिले. सर्व पैसा राजकीय लाभार्थी योजनांवर खर्च झाल्याने राज्य सरकारच्या तिजोरीत खडखडाट आहे. परिणामी, इंद्रायणी नदीवरील पूल दुरुस्त झाला नाही व माणसे वाहून गेली. हा सदोष मनुष्यवधाचाच अपराध आहे. या पूल दुर्घटनेत लोकांचे प्राण घेणाऱ्या सरकारचे मुख्यमंत्री श्रीमान फडणवीस आहेत,’’ असं 'सामना'च्या अग्रलेखात म्हटलं आहे.




**चौकशांच्या घोषणा व्यर्थ**

‘‘त्याच वेळी मालवणच्या राजकोटवरील छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याच्या चबुतऱ्याखालच्या जमिनीस तडे गेल्याची बातमी चिंताजनक आहे. आधी तेथील पहिला भव्य पुतळा कोसळला व आता नव्या पुतळ्याखालची जमीन खचली. सार्वजनिक बांधकाम खात्याचे हे अपयश आहे. इकडे इंद्रायणी नदीवरील पूल कोसळला आणि तिकडे शिवरायांच्या पुतळ्याखालचे बांधकाम बिघडले. मग यावर खर्च झालेले कोट्यवधी रुपये नक्की गेले कोठे? याची चौकशी करणार नसाल तर तुमच्या तपास आणि चौकशांच्या घोषणा व्यर्थ आहेत,’’ असा टोला ठाकरेंच्या शिवसेनेनं लगावला आहे.

**चारही बाजूंनी फक्त दुःखद**

‘‘पुण्याचे पालकमंत्री अजित पवार आहेत आणि ज्या मावळात ही भयंकर दुर्घटना घडली तेथील आमदार सुनील शेळके हे अजित पवार यांचे खास हस्तक आहेत. आमदारांना त्यांच्या गावातला जीर्ण पूल दिसला नाही, पण स्वतः निवडून येण्यासाठी त्यांनी शंभरावर कोटी रुपये खर्च केले. अजित पवार पालकमंत्री म्हणून पुण्याच्या विकासाकडे लक्ष देतात म्हणजे नक्की काय करतात? बिल्डरांचा, जमीनदारांचा विकास होतो, पण इंद्रायणी नदीवरील जीर्ण पूल कोसळून माणसे वाहून जातात. ही गरीबांची कामे विकासाच्या व्याख्येत बसत नाहीत. महाराष्ट्राला दुर्घटना आणि अपघातांचे तडाखे बसत आहेत. अहमदाबादच्या विमान अपघातात महाराष्ट्रातल्या १७ जणांचा मृत्यू झाला. केदारनाथमध्ये हेलिकॉप्टर कोसळून अकोल्याचे कुटुंब ठार झाले. गोदावरी नदीत पाच युवकांचा बुडून मृत्यू झाला. माथेरानच्या शार्लोट तलावात तीन पर्यटक बुडाले. चारही बाजूंनी फक्त दुःखद, निराश करणाऱ्या वार्ताच कानावर येत आहेत,’’ असा उल्लेख लेखात आहे.

**मुख्यमंत्री शोक व्यक्त करतात व त्यांचे खजिनदार...**

‘‘मुंबई लोकलमधून पडून झालेला पाच प्रवाशांचा मृत्यू, त्याचे दुःख आणि धक्का राज्याला अस्वस्थ करीत आहे. रेल्वे, नद्या, रस्ते, हवाई वाहतूक सगळेच या राज्यात असुरक्षित बनले आहे. अहमदाबाद विमान अपघातानंतर देशावर दुःखाचा डोंगर कोसळला. त्या दुःखाची पर्वा न करता पंतप्रधान मोदी सायप्रस वगैरे देशांच्या दौऱ्यावर गेले. विमान अपघातातील मृतांच्या चिता विझलेल्या नाहीत. कुटुंबीयांचे अश्रू थांबलेले नाहीत आणि पंतप्रधान अहमदाबादेत आले व निघून गेले. महाराष्ट्रातील सत्ताधाऱ्यांचीही तीच तऱ्हा म्हणायला हवी. नको त्या कामांसाठी उधळपट्टी करणारे सरकार इंद्रायणी नदीवरील पुलाचे काम करत नाही व एका क्षणात तो पूल कोसळून माणसे जिवंत वाहून जातात. त्यावर मुख्यमंत्री शोक व्यक्त करतात व त्यांचे खजिनदार मृतांना पाच लाखांची मदत घोषित करतात. महाराष्ट्रावर निर्दय मनाची माणसे राज्य करीत आहेत, असेच म्हणावे लागेल,’’ असं लेखाच्या शेवटी म्हटलं आहे.

# जूनपर्यंत संपूर्ण कराची रक्कम भरल्यास १०% सूट
# मालमत्ता कर वसुलीसाठी महापालिकेची योजना

**ठाणे** : ठाणे महापालिकेच्या माध्यमातून नव्या आर्थिक वर्षात मालमत्ता कर वसुलीची मोहीम १ एप्रिलपासूनच सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार करदात्यांच्या मोबाइलवर एसएमएसच्या माध्यमातून महापालिकेने बिले पाठविण्यास सुरवात केली आहे. याशिवाय १५ जूनपर्यंत संपूर्ण कराची रक्कम एकत्रित भरतील, अशा करदात्यांना मालमत्ता कराच्या सामान्य करात १० टक्के सूट देण्यात येणार असल्याचे महापालिकेच्या मालमत्ता कर विभागाने स्पष्ट केले आहे. आता ही सवलत योजना ३० जूनपर्यंत वाढविण्यात आली आहे. जे करदाते



२०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या मालमत्ता कराच्या देयकातील पहिल्या सहामाहीच्या मालमत्ता करासोबत दुसऱ्या सहामाहीचा मालमत्ता कर, अशी संपूर्ण कराची रक्कम एकरकमी १५ जूनपर्यंत महापालिकेकडे जमा करतील, अशा करदात्यांना त्यांच्या दुसऱ्या सहामाहीच्या देयकातील सामान्य करामध्ये १० टक्के सवलत देण्यात येणार आहे. यानुसार १५ जूनपर्यंत रक्कम भरल्यास १० टक्के सूट दिली जाणार आहे. तर १६ ते ३० जून या कालावधीत या रकमेचा भरणा केल्यास ४ टक्केऐवजी १० टक्के सूट दिली जाणार आहे. १ ते ३१ जुलै या कालावधीत भरल्यास ३ टक्के आणि १ ते ३१ ऑगस्ट या कालावधीत भरल्यास २ टक्के सवलत दिली जाणार असल्याची माहिती महापालिकेच्या मालमत्ता कर विभागाने दिली आहे.



# नागरी आरोग्य केंद्रांना पारितोषिक

प्रथम पारितोषिक विजेते दत्तनगर नागरी आरोग्य केंद्र यांना रुपये २ लक्ष, द्वितीय पारितोषिक विजेतेमहाराष्ट्रनगर नागरी आरोग्य केंद्र यांस रुपये १ लक्ष ५० हजार, तर मढवी नागरी आरोग्य केंद्र व मंजुनाथ नागरी आरोग्य केंद्र यांना रुपये ५० हजार असे पारितोषिक राष्ट्रीय शहरी आरोग्य नागरी अभियानाअंतर्गत प्राप्त होणार आहे. हे पुरस्कार प्राप्त झाल्यावर दत्तनगर नागरी आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.अध्वर्यु गौरकर व त्यांचे कर्मचारी महाराष्ट्रनगर नागरी आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. भारती पाटील व त्यांचे कर्मचारी तसेच मढवी नागरी आरोग्य केंद्राच्या तत्कालीन वैद्यकीय अधिकारी डॉ.पोर्णिमा ढाके व त्यांचे कर्मचारी, मंजुनाथ नागरी आरोग्य केंद्राच्या डॉ.माधुरी सोळंके व त्यांचे कर्मचारी यांचे महापालिकेच्या वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.दीपा शुक्ल यांनी अभिनंदन केले आहे.

**कल्याण** : राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानाअंतर्गत सन २०२५-२६ मध्ये कल्याण डोंबिवली महापालिकेच्या नागरी आरोग्य केंद्रांना राज्य स्तरीय कायाकल्प कार्यक्रमाचे पारितोषिक जाहीर झाले आहे.

यामध्ये दत्तनगर नागरी आरोग्य केंद्रास महाराष्ट्र राज्यात सहावा क्रमांक आणि कल्याण-डोंबिवली महानगरपालिका परिक्षेत्रात पहिला क्रमांक प्राप्त झाला आहे. तर महाराष्ट्रनगर नागरी आरोग्य केंद्रास महानगरपालिका क्षेत्रात द्वितीय क्रमांक प्राप्त झाला असून, मढवी नागरी आरोग्य केंद्र व मंजुनाथ नागरी आरोग्य केंद्र या नागरी आरोग्य केंद्रांना प्रोत्साहनपर पारितोषिक जाहीर झाले आहे.

# नालासोपाऱ्यात मनसे आक्रमक... शाळेत राडा

**विरार** : नालासोपारा येथील मदर वेलंकनी शाळेत बुधवारी सकाळी मनसे कार्यकर्त्यांनी गोंधळ घातला. यावेळी महिला कार्यकर्त्यांनी शाळेच्या मुख्याध्यापिका आशा डिसोजा यांना धक्काबुक्की करत मारहाण करण्यात आली. शाळेतील मुलांना दाखला दिला जात नसल्याच्या वादातून हा प्रकार घडला. नालासोपारा पूर्वेच्या तुळींज येथे मदर वेलंकनी एज्युकेशन ट्रस्टची शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय आहे.

दहावी उत्तीर्ण झालेल्या मुलांना शाळा सोडल्याचा दाखला दिला जात नसल्याचा आरोप काही पालकांनी केला होता. त्याचा जाब विचारण्यासाठी बुधवारी दुपारी मनसे कार्यकर्ते शाळेच्या आवारात शिरले. त्यावेळी कर्मचाऱ्यांनी अन्य बाहेरील लोकांना काठीने हाकलून द्या असे सांगितले. त्यामुळे मनसे कार्यकर्ते चिडले. ही बाब समजताच आणखी कार्यकर्ते जमा झाले. दाखले न देता विद्यार्थ्यांची अडवणूक केली जाते असा आरोप पालकांनी केला. त्यावरून मनसे कार्यकर्ते आणि शाळेच्या व्यवस्थापनात वाद झाला.

यावेळी मनसेच्या महिला कार्यकर्त्यांनी संचालिका आशा डिसोजा यांना मारहाण केली. मनसे कार्यकर्त्यांनी गोंधळ घालून तोडफोड करण्याचा प्रयत्न केला. यामुळे तणाव निर्माण झाला होता. तुळींज पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून परिस्थिती नियंत्रणात आणली. १६ तारखेपासून शाळा सुरू झाली आहे. मुले आल्यावर प्रमाणपत्र आणि निकालाची प्रत देऊ असे यापूर्वीच सांगितले होते. मात्र काल एक विद्यार्थी दाखला मागण्यासाठी आला होता. त्याला अर्ज घेऊन यायला सांगितले तर त्याचे पालक मनसे कार्यकर्त्यांना घेऊन आले,


नालासोपाऱ्यात शाळेत मनसेचा राडा

असे संचालिका आशा डिसोजा यांनी सांगितले. मनसे कार्यकर्त्यांनी तोडफोड केली आणि मला मारहाण केली असाही आरोप त्यांनी केला. मनसेने मात्र शाळेवर उर्मट वागणूकीचा आरोप केला आहे. शाळा प्रशासन विद्यार्थ्यांची अडवणूक करत होते. त्याची विचारणा करण्यासाठी आम्ही गेलो होतो. मात्र शाळेचे कर्मचारी अंगावर आले. आमच्यावर चप्पल उगारून धक्काबुक्की केली. त्याला प्रतिक्रिया म्हणून आमच्या महिला कार्यकर्त्यांनी धक्काबुक्की केली, असे मनसे शहर संघटक रवींद्र पाटेकर यांनी सांगितले.

सध्या परिस्थिती नियंत्रणात आहे. आम्ही घटनास्थळावर बंदोबस्त ठेवला आहे. यासंदर्भात तक्रार आल्यानंतर पुढील कारवाई केली जाईल, असे तुळींज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बनकर यांनी सांगितले.

आशा डिसूजा या मदर वेलंकनी ट्रस्टच्या अध्यक्षा आहेत. नुकत्याच पार पडलेल्या राज्य स्तरीय शिक्षक अधिवेशनात त्यांना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते जीवन गौरव पुरस्कार मिळाला होता. शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनिय कार्य केल्याबद्दल संस्थेला विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

# सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या कंत्राटी नियुक्तीला आव्हान
## मुख्यमंत्री, मुख्य सचिवांना नोटीस

**मुंबई** : राज्य सरकारच्या विविध विभागात सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना करार पद्धतीने पुनश्च सेवेत घेण्यास महाराष्ट्र राज्य स्वयंरोजगार सहकारी सेवा संस्थेने आक्षेप घेतला आहे. सरकारी खात्यात सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना सेवेत घेण्याचा शासन निर्णय तातडीने रद्द करावा, यासाठी मुख्यमंत्री, मुख्य सचिव यांना वकिलांमार्फत ईमेल रजिस्टरद्वारे नोटीस बजावण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र राज्य स्वयंरोजगार सहकारी सेवा संस्था व राज्य स्थापत्य अभियंता संघटनेचे अध्यक्ष मिलिंद भोसले यांनी दिली. राज्यात ८ ते १५ लाख किंवा त्या पेक्षाही जास्त एवढी सुशिक्षित बेरोजगार तरुणांची संख्या आहे, याची माहिती शासनास अवगत आहे. तरी जाणूनबुजून मर्जीतील सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना पुनश्च सेवेत घेण्याचा घाट घातला जात आहे, असा आरोप भोसले यांनी केला. राज्यातील सर्व सुशिक्षित बेरोजगार तरुण तरुणींच्या हाताला काम न देता निवृत्त अधिकारी व कर्मचारी यांनाच शासकीय कामांचा लाभ देणे या पाठीमागे शासनाचा काय फायदा होणार आहे, हे शासनाने स्पष्ट करावे, असे आवाहन राज्य सरकारला केल्याचे ते म्हणाले. राज्यकर्ते यांनी राज्यातील जनतेला स्पष्ट सांगणे गरजेचे आहे अन्यथा राज्यात सुशिक्षित बेरोजगार तरुण-तरुणींमध्ये असंतोष निर्माण होईल. शासनाने हा निर्णय तातडीने रद्द करावा यासाठी मुख्यमंत्री व मुख्य सचिवांना नोटीस बजावण्यात आल्याचे भोसले यांनी स्पष्ट केले.

# मुद्रांक शुल्कात सवलत... राज्य मंत्रिमंडळाची मंजुरी

**मुंबई** : धारावी पुनर्विकास प्रकल्पातील विशेष हेतू कंपनी आणि अन्य यंत्रणा दरम्यानच्या भाडेपट्टा करारावरील मुद्रांक शुल्कात सवलत देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे धारावीतील साडेआठ लाख घरांना मुद्रांक शुल्कापोटी भराव्या लागणाऱ्या १ हजार रुपयांची बचत होणार आहे. पुनर्वसन व पुनर्विकासाच्या योजनेला अत्यावश्यक नागरी प्रकल्प तसेच विशेष प्रकल्प म्हणूनही घोषित करण्यात आले आहे. अशा अत्यावश्यक नागरी प्रकल्पांसाठी मुद्रांक शुल्कात सवलत देण्याचे किंवा ते माफ करण्याचे धोरण यापूर्वीच निश्चित करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्यास मान्यता देण्यात आली. दरम्यान, धारावी पुनर्विकास प्रकल्पाला चालना देण्यासाठी 'स्टॅम्प ड्युटी'त सवलत दिल्याने धारावीतील पात्र-अपात्र झोपडीवासीयांना दिलासा मिळणार आहे, असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.



धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी विशेष हेतू कंपनी स्थापन करण्यातआली आहे. तिच्या माध्यमातून या परिसराचा एकत्रित पुनर्विकास करण्यात येत आहे. पुनर्वसन व पुनर्विकासाच्या योजनेला अत्यावश्यक नागरी प्रकल्प तसेच विशेष प्रकल्प म्हणूनही घोषित करण्यात आले आहे. अशा अत्यावश्यक नागरी प्रकल्पांसाठी मुद्रांक शुल्कात सवलत देण्याचे किंवा ते माफ करण्याचे धोरण यापूर्वीच निश्चित करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने या प्रकल्पातील रेल्वे जमीन विकास प्राधिकरण, नवी दिल्ली आणि धारावी पुनर्विकास प्रकल्प किंवा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण (एसआरए) मुंबई यांच्यामध्ये होणा[illegible]या पोटभाडेपट्ट्याच्या करारासाठी मुद्रांक शुल्कात सवलत देण्याचा प्रस्ताव होता. तसेच भाडेपट्ट्यांच्या या दस्त प्रकारांचा सवलत धोरणात समावेश करावा, असा प्रस्ताव होता. त्यानुसार या दस्त प्रकारांचा सवलत धोरणात समावेश करण्यास मंगळवारी मान्यता देण्यात आली. जेणेकरून या प्रकल्पाच्या अंमलबजावणीला चालना मिळणार आहे.

**विरार-अलिबाग कॉरिडोर 'बीओटी' तत्त्वावर बांधणार**

बहुचर्चित विरार-अलिबाग मल्टिमॉडल कॉरिडोर आता 'बीओटी' तत्त्वावर बांधण्यात येणार असल्यामुळे या प्रकल्पाच्या भूसंपादनास लवकरच गती मिळणार आहे. हा प्रकल्प आता 'बीओटी' (बांधा-वापरा-हस्तांतरित करा) तत्त्वावर उभारला जाणार असून त्याला मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. मुंबई महानगर प्रदेशातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी, विरार-अलिबाग अंतर कमी करण्यासाठी १२८ किमी लांबीच्या विरार-अलिबाग बहुउद्देशीय मार्गिकची उभारणी करण्यात येणार आहे.

# पालकांची लाखो रुपयांची लूट, आरोपी संदीप शाहचे आणखी कारनामे समोर
# कोणाकडून ५० लाख तर कोणाकडून २८ लाख घेतले

**सोलापुर** : नीट परीक्षेत गुण वाढवून देण्याचे प्रलोभना दाखवत पालकांची लूट केल्याचा आरोपाखाली सीबीआयने अटक आरोपी संदीप शाहला अटक केली आहे. संदीप शाहने लाखो रुपयांची लूट केल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, या घटनेनंतर संदीप शाहचे आणखी काही प्रताप आता समोर आले आहेत. सोलापुरातील विविध पोलीस स्टेशनमध्ये आरोपी संदीप शाहच्या विरोधात या आधी तीन गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे.

**पैसे स्वीकारुन कोणालाही ॲडमिशन मिळवून दिले नाही**

या सर्व प्रकरणात आरोपी संदीप शाह याने पैसे स्वीकारुन कोणालाही ॲडमिशन मिळवून दिले नाही. तीनही प्रकरणात आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर पालकांनी आरोपी संदीप शाह विरोधात सोलापुरातील विजापूर नाका, फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. या प्रकरणात जामीनावर तुरुंगातून सुटलेल्या संदीप शाह याने हा फसवणूकीचा धंदा सुरूच ठेवला होता. काही दिवसांपूर्वी नीट 2025 च्या परीक्षेत गुण वाढवून देण्यासाठी 90 लाखांची मागणी करतं 87 लाख 50 हजार रुपये स्वीकारल्याप्रकरणी संदीप शाह याला सीबीआयने अटक केली आहे.



**विद्यार्थी आणि पालकांची लाखो रुपयांची लूट**

मूळचा सोलापूरचा असलेला संदीप शाह हा वैद्यकीय क्षेत्रात प्रवेश मिळवून देतो, नीट परीक्षेत गुण वाढवून देतो असे आमिष देऊन विद्यार्थी आणि पालकांची लाखो रुपयांची लूट करत होता. सोलापुरातील विविध पोलीस स्टेशनमध्ये आरोपी संदीप शाह विरोधात या आधी तीन गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे. २०१६ साली एका वर्तमानपत्रात संदीप शाह याने एमबीबीएस प्रवेश अशा आशयाची जाहीरात दिली होती. ती जाहिरात पाहून संदीप शाह याला संपर्क करणाऱ्या व्यक्तीला एमबीबीएस मध्ये मॅनेजमेंट कोट्यातून प्रवेश मिळवून देतो असे सांगून तब्बल ५० लाख रुपये घेतले होते. दुसऱ्या प्रकरणात एमबीबीएस मध्ये प्रवेश मिळवून देतो असे सांगून एका विद्यार्थिनीच्या पालकाकडून तब्बल २८ लाख रुपये घेतले होते. तर तिसऱ्या प्रकरणात दंतरोग महाविद्यालयात शिकणाऱ्या एका विद्यार्थ्याला बंगळूरूच्या प्रसिद्ध महाविद्यालयात MDS (ऑर्थो) मध्ये प्रवेश मिळवून देण्याचे आमिष दिले होते. या पालकाकडून सुमारे १० लाख ३४ हजार रुपयांची मागणी आरोपी संदीप शाह याने केली होती.

# भाईंदर ते मिरारोड स्थानका दरम्यान रेल्वे ट्रॅकवर व्यक्ती झोपलेला

**भाईंदर** : चर्चगेट ते विरार पश्चिम रेल्वे मार्गावर भाईंदर ते मिरारोड स्थानकांच्या दरम्यान घडलेल्या एका प्रसंगात मोटरमनच्या सतर्कतेमुळे एका व्यक्तीचा जीव वाचला आहे. लोकल रेल्वेचे मोटरमन अरविंद कुरेल यांनी प्रसंगावधान राखून वेळेवर ट्रेन थांबवत मोठा अनर्थ टळला आहे. तर जीव वाचवलेला व्यक्ती हा मनोरुग्ण असल्याची माहिती मिळाली आहे. यामुळे रेल्वे पोलिसांनी ताब्यात घेत संबंधित व्यक्तीच्या घरी नेऊन सोडले आहे. तर संबंधित मोटरमन यांचा सतर्कतेमुळे जीव वाचल्याने त्यांचा पश्चिम रेल्वे कडून गौरव करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

मोटरमन अरविंद कुरेल यांनी सांगितले की, १४ जून रोजी दुपारच्या सुमारास ट्रेन भाईंदर आणि मिरारोड दरम्यान होती. तेव्हा मला ट्रॅकवर एक व्यक्ती झोपलेला असल्याचे दिसला. त्यावेळी




मी तात्काळ हॉर्न वाजवून आपत्कालीन ब्रेक लावला. ट्रेन थांबवल्यानंतर तो व्यक्ती उठून दुर्सया डब्याच्या खाली जाऊन बसला. त्याला तात्काळ त्या डब्याखालून बाहेर काढण्यात आले आणि त्यामुळे त्याचा जीव वाचला,असे त्यांनी सांगितले. या प्रसंगात मोटरमनने दाखवलेली तत्परता आणि कार्य लक्षवेधी ठरले असून पश्चिम रेल्वेने त्यांचा लवकरच गौरव करण्याची घोषणा रेल्वेने केली आहे. रेल्वे प्रवाशांमध्ये आणि कर्मचार्यांमध्ये या घटनेमुळे मोठा दिलासा व्यक्त करण्यात येत आहे.

# शिर्डीमध्ये पालकांचे डोक सुन्न करणारी घटना!
## वाढदिवासाची पार्टी करण्यासाठी ७ मित्रांनी एका व्यक्तीचा जीव घेतला

**नाशिक** : वाढती बालगुन्हेगारी हा समाजासाठी चिंतेचा विषय झाला आहे. अहिल्यानगरमध्ये वाढदिवसाच्या पार्टीसाठी सात मित्रांनी एका व्यक्तीची अपहरण करुन हत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. शिर्डीजवळ ही घटना घडली आहे. मुलांनी हत्येची कबुली देताना जे काही सांगितले ते जाणून पोलिसही हादरले.

हत्या करणारे सातही मित्र एकाच परिसरात राहतात. या मित्रांपैकी एकाचा वाढदिवस होता. वाढदिवसाच्या पार्टीसाठी त्यांना पैसे हवे होते यासाठी त्यांनी चक्क गणेश चत्तर यांचं अपहरण केलं.. अपहरणानंतर त्यांचा गळा आवळून खून केला. त्यांच्या खिशातील फोन काढला आणि तो विकून पार्टी केलीय.. विक्री केलेला फोन एका तरुणानं विकत घेतला आणि तो फोन ऑन केल्यामुळे हत्येचं बिंग फुटलं.

कोपरगाव तालुक्यातील चासनळी येथील ४२ वर्षीय गणेश सखाहरी चत्तर हे ८ जूनपासून बेपत्ता होते. त्याच दरम्यान शिर्डी जवळील नांदुर्खी बुद्रुक येथे एका शेतात अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याने




पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली होती. मृत व्यक्तीच्या पाठीवर धारदार शस्त्राने हल्ला केल्याने त्याचा मृत्यू झाल्याचा वैद्यकीय अहवाल १३ जून रोजी प्राप्त झाल्यानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली.

मयत व्यक्ती ही कोपरगाव तालुक्यातील हांडेवाडी येथील असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले. या मृताचा मोबाइल अल्पवयीन मुलांनी शहरातील एका दुकानदाराला साडेचार हजार रुपयांना विकला. त्यातून मिळालेल्या पैशातून वाढदिवस साजरा करण्यात आला. दुकानदाराकडून हा चोरीचा मोबाइल यातीलच एका मुलाने विकत घेऊन चालू केला आणि त्यानंतर या खुनाला वाचा फुटली.

गणेश चत्तर हे रस्त्याने पायी जात असताना त्यांचे अपहरण करण्यात आले आणि त्यांना उसाच्या कांडक्याने तसेच हाताने मारहाण करून त्यातील एकाने त्यांचा गळा दाबला.. त्याच वेळी दोन जणांनी चाकूने त्यांच्यावर हल्ला करत त्यांचा खून केला. मृतदेह उसाच्या शेतात टाकत त्यांच्या खिशातील मोबाइल काढून घेतला.. हा मोबाइल नंतर साडेचार हजार रुपयांना विकला.. पैशाच्या उद्देशाने हा खून केल्याची कबुली या मुलांनी पोलिसांना दिली. यातील काही अल्पवयीन मुले नशेत होती.. त्यांच्याकडे मद्याच्या बाटल्या आढळल्याचे पोलीस तपासात समोर आलंय.. पोलिसांनी सात अल्पवयीन आरोपींवर गुन्हा दाखल करत त्यांना ताब्यात घेतलंय.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com